१०३ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, शुक्रवार ८ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३२२, पाने-८, किंमत : ₹ ६
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 322, Marathi - Daily - Pune, 8 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com


## गोपाळकाला व अनंत चतुर्दशीची सुट्टी बदलली



**मुंबई** - महाराष्ट्र सरकारने राज्यातील दोन सुट्ट्यांमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या शुद्धीपत्रकानुसार गोपाळकाला (दहीहंडी) आणि अनंत चतुर्दशीच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या असून, नारळी पौर्णिमा आणि ज्येष्ठ गौरी विसर्जन या दिवशी स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. पूर्वीच्या शासन निर्णयानुसार, १६ ऑगस्ट रोजी दहीहंडीची तर ६ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीची सुट्टी जाहीर करण्यात आली होती. त्याएवजी आता शुक्रवार ८ ऑगस्टला नारळी पौर्णिमेची आणि मंगळवार २ सप्टेंबर ज्येष्ठगौरी विसर्जनाची सुट्टी घोषित करण्यात आली आहे.

## सरनाईकांच्या 'गोविंदा'ला रॅपिडोची स्पॉन्सरशिप

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे पुत्र पूर्वेश सरनाईक यांनी आयोजित केलेली प्रो-गोविंदा स्पर्धा आजपासून ९ ऑगस्टपर्यंत वरळीतील डोम येथे रंगणार आहे. या स्पर्धेसाठी बाईक सेवा कंपनी रॅपिडोकडून स्पॉन्सरशिप घेतल्याने सरनाईक वादात सापडले आहेत. काही दिवसांपूर्वी रॅपिडो या बाईक सेवा बेकायदेशीर असल्याने कंपनीवर कारवाईचे संकेत दिले होते. मात्र, ज्या रॅपिडोवर कारवाईची भाषा केली, त्याच कंपनीकडून त्यांच्या मुलाने स्पॉन्सरशिप घेतल्याचे उघड झाल्याने प्रताप सरनाईक वादात सापडले आहेत.**




■ मुंबई

२ जुलै रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मुंबईत एका अनधिकृत रॅपिडो बाईक टॅक्सीला रंगेहाथ पकडले होते. त्यावेळी राज्यात बाईक टॅक्सीला परवानगी नसताना, त्या धावत असल्याचा आरोप करत सरनाईक यांनी कारवाई करणार असल्याचे म्हटले होते. याशिवाय राज्याने नुकतेच ई-बाईक धोरण जाहीर केले असून, त्यानुसार केवळ इलेक्ट्रिक बाईक असलेल्या कंपन्यांना परवानगी मिळणार असल्याचे सरनाईक यांनीच सांगितले होते. आता रॅपिडो कंपनीकडूनच स्पॉन्सरशिप घेतल्याने विरोधकांनी सरनाईक यांच्यावर मंत्रिपदाचा गैरवापर केल्याचा आरोप केला आहे.

रोहित पवार एक्स पोस्टमध्ये म्हणाले की, रॅपिडो बाईक आली तेव्हा खुद्द परिवहन » पान ७ वर

# राहुल गांधींनी यावेळी पुरावेच दिले! मतांची चोरी एकाचे अनेक केंद्रांत-अनेक राज्यांत मतदान



**भाजपावर ईव्हीएम घोटाळ्याचा वारंवार आरोप करणारे काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आज निवडणूक आयोगानेच दिलेल्या मतदार याद्यांचा आधार घेत त्यामध्ये करण्यात आलेल्या गैरप्रकारांचा पुराव्यानिशी पर्दाफाश केला. एकेका मतदाराने एकाहून अनेक मतदान केंद्रांवर आणि एकाहून अनेक राज्यांमध्ये अनेकदा मतदान केल्याची उदाहरणे निवडणूक आयोगानेच दिलेल्या यादीतून शोधून काढून राहुल गांधी यांनी माध्यमांसमोर मांडली. तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्यासाठी नरेंद्र मोदी यांना लोकसभेच्या २५ जागांची गरज होती. यासाठी बोगस मतदार, बनावट नावे, बनावट पत्ते असे प्रकार करण्यात आले. भाजपाच्या या कृष्णकृत्यामध्ये निवडणूक आयोग सामील असून, भाजपा आणि निवडणूक आयोग मिळून देशातील लोकशाहीच संपवण्याच्या प्रयत्नात आहेत, असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला.**

■ नवी दिल्ली

**महाराष्ट्रात** लोकसभा निवडणुकीत आमच्या महाविकास आघाडीचा दणदणीत विजय होतो आणि त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र आमची पुरती वाताहात होते, हे कसे काय शक्य झाले, असा सवाल राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा उपस्थित केला. महाराष्ट्रात अवघ्या पाच महिन्यांत मतदारांच्या संख्येत त्याआधीच्या पाच वर्षांत झाली नव्हती एवढी प्रचंड वाढ कशी काय झाली, असा सवालही राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा विचारला.

निवडणूक आयोगावर पक्षपातीपणा आणि गुन्हेगारी स्वरूपाच्या कारस्थानामध्ये सहभागी असल्याचा आरोप करताना राहुल गांधी यांनी काही उदाहरणे सांगितली. ते म्हणाले की, आम्हाला नुसता संशय नव्हे तर खात्रीच झाली होती की, निवडणूक आयोग सत्ताधाऱ्याची मदत करत आहे. त्यामुळे आम्ही निवडणूक आयोगाकडे एकेका मतदारसंघातील मतदार याद्या डिजिटल स्वरूपात मागितल्या. त्या देण्यास आयोगाने नकार दिला. कारण याद्यांमध्ये केलेला घोटाळा आयोगाला लपवायचा होता. आम्ही आयोगाकडे शेकडो वेळा पाठपुरावा केला. पण आयोग मतदार याद्या डिजिटल स्वरूपात द्यायला तयार झाला नाही. मग आम्ही कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीतील केवळ बंगळुरूवर लक्ष केंद्रित केले. बंगळुरुमधील ७ मतदारसंघांपैकी ६ मतदार संघांमध्ये भाजपाचा पराभव झाला. पण महादेवपुरा या एका मतदारसंघात भाजपाला भरभरून मते मिळाली. हे असे का झाले हे तपासण्यासाठी आम्ही महादेवपुरा विधानसभा मतदारसंघातील मतदार याद्या आयोगाकडे मागितल्या. आयोगाने या याद्या डिजिटल स्वरूपात न देता छापील स्वरूपात दिल्या. याद्यांचा हा ढीग ७ फूट उंच आणि कित्येक किलो वजनाचा होता. हेतू हा की, एवढ्या प्रचंड कागदपत्रांमधून आम्हाला घोळ शोधून काढता येऊ नये. पण आम्ही त्यावरही तोडगा काढला. आम्ही या सर्व मतदार याद्यांची छाननी करण्यासाठी कार्यकर्त्यांची फौजच कामाला लावली. तरीही आम्हाला एका मतदारसंघातील मतदार याद्यांची छाननी करण्यासाठी सहा महिन्यांचा अवधी लागला. पण त्यातून जे सत्य बाहेर आले ते अत्यंत धक्कादायक आहे. निवडणूक आयोगानेच दिलेल्या या यादीतून आम्हाला असे आढळून आले की, महादेवपुरा मतदारसंघात १ लाख २५० मतदार बोगस आहेत. मतदारांचे बोगस छायाचित्र, बनावट पत्ते, एकेका घरात ८० हून अधिक मतदार, छायाचित्रच नसणे आणि पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या मतदारांसाठी असलेल्या अर्ज क्र. ६ मधील हेराफेरी अशा पाच प्रकाराने » पान ७ वर

## राज ठाकरेंबाबत 'इंडिया'च्या कोणत्याही अटीशर्ती नाहीत

**उद्धव ठाकरेंचे दिल्लीत वक्तव्य**

■ नवी दिल्ली

**उबाठा** प्रमुख उद्धव ठाकरे इंडिया आघाडीच्या बैठकीसाठी सध्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. आज त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांना राज ठाकरे इंडिया आघाडीत येणार का, असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना ते म्हणाले की, आम्हा दोघांचा निर्णय घेण्यास आम्ही दोघे बंधू खंबीर आहोत. आम्हाला जे करायचे आहे ते आम्ही करू. यात आम्हाला तिसऱ्याची आवश्यकता नाही. राज ठाकरेंबाबत इंडिया आघाडीच्या कोणत्याही अटीशर्ती नाहीत.

उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत मतदार याद्यांच्या घोळावरही भाष्य केले. ते म्हणाले की, बिहार, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. बिहार निवडणुकीत मतदार याद्यांचा घोळ » पान ७ वर



## न्या. वर्मा यांची याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

■ नवी दिल्ली

**सरकारी** निवासस्थानात जळलेली बेहिशेबी रोकड सापडल्याने अडचणीत आलेले न्या. यशवंत वर्मा यांची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली.

न्यायमूर्ती वर्मा यांची दिल्लीतील त्यांच्या अधिकृत निवासस्थानी बेहिशेबी रोख रक्कम सापडल्याच्या घटनेनंतर अंतर्गत चौकशी झाली होती. या चौकशीच्या अहवालाला आणि भारताचे माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी केलेल्या महाभियोगाच्या शिफारशीला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. यासंदर्भात न्यायालयाने स्पष्ट केले की, संबंधित अंतर्गत समितीची रचना व कार्यपद्धती कायदेशीर होती. त्यात काहीही बेकायदेशीर नव्हते. न्यायमूर्ती वर्मा यांनी अंतर्गत चौकशीत सहभागी झाल्यानंतर त्याच चौकशी समितीच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित करत याचिका दाखल केली आहे. त्यामुळे ही याचिका विचारात घेता येणार नाही.

## कबुतरखान्यांवर बंदीच राहणार उच्च न्यायालयाचा निर्णय कायम

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाने कबुतरखान्यात कबुतरांना अन्नपाणी देण्यावरील बंदी कायम ठेवली आहे. यामुळे राज्य सरकारच्या कबुतरांना मर्यादित खाद्य देण्याच्या निर्णयाला झटका बसला आहे.

काल जैन समाज बांधवांनी आक्रमक भूमिका घेऊन दादर येथील कबुतरखान्यावर पालिकेने केलेल्या कारवाईची फज्जा उडवला होता. या पार्श्वभूमीवर दादर कबुतरखाना परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात होता. आज या प्रकरणावर उच्च न्यायालयात सुनावणी झाली.



यावेळी न्यायाल्याने म्हटले की, कबुतरांसाठी पर्यायी जागेचा विचार केला जाऊ शकतो. कबुतरखान्यांच्या आजूबाजूने हजारो लोक ये-जा करतात. त्यांच्या आरोग्याचा प्रश्न आहे. या सगळ्या प्रकरणाला कुठलाही वेगळा रंग देण्याची गरज नाही. आमच्यासाठी नागरिकांचे आरोग्य महत्त्वाचे आहे. याप्रकरणी वैद्यकीय अहवाल मागवला होता. तज्ज्ञ डॉक्टरांच्या समितीच्या या अहवालात गंभीर आजाराची लक्षणे दिली आहेत. त्याचा विचार करून नागरिकांचे आरोग्य सगळ्यात महत्त्वाचे आहे. त्यामुळे आम्ही हा निर्णय दिला. हाच निर्णय कायम असेल. » पान ७ वर

## नागपुरात ओबीसी भवन होणार मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

■ पणजी

**नागपूरमध्ये** राष्ट्रीय ओबीसी महासंघासाठी भव्य ओबीसी भवन उभारण्यात येणार असून, लवकरच काम सुरू होणार आहे. ओबीसी समाजाच्या हक्कासाठी मी लढतच राहणार आहे. मी ती लढाई कधी थांबवणार नाही अशी ग्वाही आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. गोवा येथे आयोजित राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या १० व्या राष्ट्रीय महाअधिवेशनाचे उद्घाटन देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ओबीसी आहेत. स्वातंत्र्यकाळानंतर मोदी यांनीच ओबीसींना मंत्रिमंडळात सर्वात जास्त स्थान दिले. मीदेखील ओबीसी महासंघाशी संबंधित आहे. त्यामुळे ओबीसी समाजासाठी बोलतो, म्हणून टीकेचा सामना करावा लागतो. तरीही मी लढतच राहणार. ओबीसी समाजासाठी आमच्या सरकारने ५० महत्त्वाचे निर्णय घेतले. आम्ही ओबीसीसाठी कुठेही निधीची कमी भासू देणार नाही. नागपूरमध्ये राष्ट्रीय ओबीसी महासंघासाठी भव्य ओबीसी भवन उभारण्यात येणार असून, लवकरच या वास्तूचे काम सुरू करणार आहोत. उपस्थितांनी परिणय फुके यांना ओबीसी समाजाचा मंत्री बनवण्याची मागणी केली आहे. पण अनेक लोक त्यांना मुख्यमंत्री समजतात.

## शेतकरी, मच्छीमार, पशुपालक यांच्या हिताशी तडजोड कदापि करणार नाही

■ नवी दिल्ली

**देशातील** शेतकरी, मच्छीमार आणि पशुपालकांच्या हिताशी भारत कदापि तडजोड करणार नाही. त्यासाठी कितीही किंमत चुकती करावी लागली तरी आम्ही डगमगणार नाही, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकत्याच भारतावर लादलेल्या आयात शुल्कावर आपली ठाम भूमिका मांडली.

**ट्रम्प धमकीवर मोदींची भूमिका**

राजधानी दिल्लीत डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय कृषी संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. मी माझ्या देशातील शेतकऱ्यांच्या, मच्छिमारांच्या आणि पशुपालकांच्या हिताशी कदापि तडजोड करणार नाही. त्यासाठी मोठी वैयक्तिक किंमत चुकती करावी लागेल याची मला जाणीव आहे. परंतु मी आणि माझा देश ती किंमत चुकती करायला तयार आहे. देशाची अन्नसुरक्षा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांच्या हिताला मी सर्वोच्च प्राधान्य देतो, असे मोदी म्हणाले.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे दुसऱ्यांदा हाती घेतल्यापासून ट्रम्प यांनी भारतासह जगभरातील सर्व देशांवर आयात शुल्कवाढीचे अस्त्र उगारले आहे. अमेरिकेला भारताशी व्यापारी करार करायचा आहे. या कराराच्या माध्यमातून अमेरिकन कंपन्यांना भारताच्या कृषी क्षेत्रात मुक्त वाव मिळावा असा ट्रम्प यांचा आग्रह आहे.

## सीआरपीएफ बस दरीत कोसळून तीन जवान ठार! १६ जखमी

■ उधमपूर

**जम्मू** आणि काश्मीरच्या उधमपूरमध्ये आज सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास १८७ बटालियन सीआरपीएफ जवानांची बस बसंतगडहून परत येत असताना २०० फूट दरीत कोसळली. या भीषण अपघातात ३ जवान शहीद झाले असून, १६ जवान जखमी झाले आहेत. या अपघाताची माहिती मिळताच बचावकार्य सुरू करण्यात झाले.



अतिरिक्त पोलीस अधीक्षक संदीप भट यांच्या माहितीनुसार, अपघातानंतर पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बचावकार्य सुरू केले आणि जखमी जवानांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी एक्सवर लिहिले की, उधमपूरजवळ » पान ७ वर

## अबु सालेमला ६० वर्षे तुरुंगात राहावे लागेल

**सरकारची हायकोर्टात माहिती**

■ मुंबई

**भारत** आणि पोर्तुगाल यांच्यामध्ये गुन्हेगार हस्तांतरणाबाबत झालेल्या कायद्यानुसार गँगस्टर अबु सालेमला शिक्षेचा प्रत्यक्ष २५ वर्षांचा कालावधी तुरुंगात राहावे लागेल किंवा शिक्षेतील माफीचा किंवा सवलतीचा कालावधी समाविष्ट केल्यास ६० वर्षे तुरुंगात राहावे लागेल. त्यानंतरच तो तुरुंगातून सुटका करण्यास पात्र ठरेल, असे राज्य सरकारच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या शपथपत्राद्वारे सांगण्यात आले आहे.

अबु सालेमच्या वतीने उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये असा दावा करण्यात आला आहे की, त्याच्या कारावासाची २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे त्याला तुरुंगातून मुक्त करण्यात यावे. या याचिकेवर स्पष्टीकरण करताना राज्य सरकारच्या वतीने नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक अण्णा ए. मुगुटराव यांनी हे शपथपत्र न्यायालयात दाखल केले. अबु सालेम हा ४ जुलै २०२४ पासून नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात आहे.

सालेमच्या वतीने ॲड. फरहान शाह यांनी याचिका दाखल केली आहे.

त्यात त्यांनी असा दावा केला आहे की, सालेमने सन २००५ ते २०१७ अशी १२ वर्षे कच्चा कैदी म्हणून तुरुंगात व्यतीत केली आहेत. त्यानंतर दुसऱ्या एका खटल्यात दोषी ठरल्याने आणखी १० वर्षे त्याने तुरुंगात काढली आहेत.

## रक्षाबंधनापूर्वी सोन्याचा भाव एक लाखावर

■ जळगाव

**रक्षाबंधनपूर्वी** जळगावच्या सराफ बाजारात सोन्या-चांदीच्या दरांनी विक्रमी उच्चांक गाठला आहे. सोन्याचे दर



इतिहासात प्रथमच जीएसटीसह १,०४,०३० रुपये प्रति १० ग्रॅम या पातळीवर पोहोचले असून, मागील पाच दिवसांत त्यात २,५७५ रुपयांची वाढ झाली आहे. चांदीच्या दरातही २४ तासांत २,००० रुपयांची वाढ झाली. चांदीचे दर जीएसटीसह १,१७,४२० रुपये प्रति किलो झाले आहे. त्यामुळे रक्षाबंधनासाठी दागदागिने खरेदी करणाऱ्या ग्राहकांच्या खिशाला चांगलाच फटका बसणार आहे. सराफ व्यावसायिकांच्या मते, रशियाकडून कच्च्या तेलाच्या खरेदीवरून भारत-अमेरिकेतील वाढता तणाव आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकत्याच भारतावर लादलेल्या आयात शुल्कामुळे सोन्याच्या दराने उच्चांक गाठला आहे.

## चंद्या, आमश्या हे आमचे टार्गेट गावित यांच्या वक्तव्याने नवा वाद

■ नंदुरबार

माझे टार्गेट चंद्या व आमश्या आहे, असे वक्तव्य भाजपा आमदार विजयकुमार गावित यांनी धडगाव-अक्कलकुवा तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या भाजपा कार्यकर्ता मेळाव्यात केले. त्यांचा रोख शिवसेना शिंदे गटाचे आमदार आमश्या पाडवी आणि चंद्रकांत रघुवंशी यांच्याकडे असल्याने महायुतीच्या मित्रपक्षांमधील वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. गावित यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार असल्याचेही जाहीर केले.

विजयकुमार गावित म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत माझे फक्त टार्गेट चंद्या व आमशा आहेत. या दोघांना जास्त मस्ती चढली आहे आणि आम्ही ती जिरवणार आहोत. आमशा पाडवी यांच्या नावावर बारा बंगले आहेत. त्यांच्या पत्नीकडे चार बंगले आहेत. त्यांनी पंतप्रधान घरकुल योजनेचा लाभ घेतला आहे. पाडवी यांनी बायको आणि मुलाने शबरी आणि पंतप्रधान घरकुल योजनेचा लाभ घेतला आहे.

त्यांच्या वक्तव्यावर पलटवार करत शिंदे गटाचे आमदार चंद्रकांत रघुवंशी म्हणाले की, परमेश्वरानेच डॉ. विजयकुमार गावित यांची मस्ती जिरवली आहे. त्यांच्यामुळे पक्षाची प्रतिमा मलिन होत होती. त्यामुळे डॉ. गावित यांना मंत्रिपदावरून काढले. भाजपाला डॉ. गावितांकडून धोका आहे.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (22,000-75,000) **9820628009 / 9833470199** {NC251844}

सुरक्षा रक्षकः १२ तास ₹ १४,०००/- माहीम, माटुंगा सेंट्रल **9137835512 / 9870002587** {NC251886}

नवीन टायर्स, युरिया, इंजिन ऑईल व बॅटरी विक्री व मार्केटिंगसाठी रिटायर्ड व्यक्ती पाहिजे. टीप :- दीर्घ मुदतीची सुट्टी मिळणार नाही (गणपती व मे महिना) भेटा - गोडाऊन-आशीर्वाद टायर सर्व्हिस, 119 - सी, रणजित स्टुडिओ, दादासाहेब फाळके रोड, दादर (पूर्व), मुंबई - 400014. मो. **9833052044/9867709545** {NCC250052}

भिवंडी पडघा येथे प्रिंटींग प्रेस मध्ये KBA Offset मशीनवर काम करण्यास प्रिंटर, फीडरमन व हेल्पर पाहीजेत. तसेच मॅन्युअल पंचींग मशीन, लॅमिनेशन मशीन व पोलार कटींग मशीनसाठी ऑपरेटर पाहीजेत. कल्याण स्टेशनवरून नेण्यासाठी व आणण्यासाठी कंपनीची गाडी असेल.
संपर्क
**9224455770**

पेस्टिंग, बुकबाईंडिंग/कार्टन पेस्टिंगच्या कामात अनुभवी पेस्टर, कारीगर व हेल्पर पाहिजेत. वेतन 20,000/- संपर्क - **8652471232** {NC251849}

घाटकोपरमध्ये मॅटर्निटी हॉस्पिटलसाठी अनुभवी आया मावशी व नर्सेस पाहिजेत. **9920873044** {NC251826}

ठाण्यातील प्रा. लि. कंपनीला विविध पदांसाठी दहावी, बारावी, पदवीधर पास/नापास ३० मुले / मुली कायमस्वरुपी पाहिजेत. (फ्रेशर्सना प्राधान्य) प्लेसमेंट नाही. पगार 15000 - 45000/- **7021534944/ 9819778053** {NC251842}

## पाहिजेत

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC251890}

मालाड वेस्टमध्ये इमीटेशन कामासाठी मुली पाहिजेत. आकर्षक पगार **9870041713.** {NC251836}

**पाहिजेत**
नवीन पनवेल मुंबई येथे अॅग्रो टुरिझम फार्मसाठी अनुभवी
**किचन हेल्पर कम हाऊस किपींग स्टाफ**
पाहिजे . राहण्याची आणि जेवणाची सोय केली जाईल. पगार १५,०००/-
संपर्क :- (व्हाट्सअँप कॉल फक्त)
**9082427905**
**9820607950**

आश्रममध्ये 24 तासासाठी आया, वॉर्डबॉय आणि जेवणाच्या कामासाठी बाई हवी डोंबिवली **8379998437** {NC251866}

दहिसर (ईस्ट) / घोडबंदररोड ठाणे येथे हाऊसकिपिंगसाठी मुले पाहिजेत. 14000/- **9820219764 / 8591074394** {NC251865}

अंधेरी पूर्व इलेक्ट्रॉनिक इन्स्ट्रुमेंट कंपनीसाठी अनुभवी डिप्लोमा इंजिनियर, ITI टेक्निशिअन आणि पीसीबी सोल्डरिंगसाठी अनुभवी महिला/ मुली पाहिजेत. प्रीमीयर इलेक्ट्रॉनिक **9988117372** {NC251856}

मुलुंड येथे बँकसाठी फिल्ड कलेक्शन - टेलिकॉलिंग स्टाफ हवा आहे, पगार 12,000/- ते 22,000/- (शिक्षण 10वी, 12वी) संपर्क - **7021506468** {NC251882}

डीमार्ट, बिग बाजार पॅकिंग जॉब पगार 20000 - 25000. फोन : **9167759871** {NC251898}

दादर पश्चिमला दहावी, बारावी शिकलेली अनुभवी/बिनअनुभवी ऑफिस असिस्टंट हवी - **8879166871 / 9082148924** {NC251897}

## पाहिजेत

सोलना ऑफसेट मशीनसाठी बॉयलर पाहिजे. (भायखळा) **9820017588** {NC251896}

वकिलाच्या ऑफिसमध्ये कामासाठी मुले पाहिजे. 32 च्या आत मध्ये भांडुप संपर्क करावा **9892769253** {NC251895}

ठाणे अॅड एजन्सीमध्ये DTP ऑपरेटर मुलगा पाहिजेत. इंग्लिश / मराठी /हिंदी टायपिंग आवश्यक - वेळ :- दुपारी 12 ते 9 वाजेपर्यंत. **7506284829** {NC251894}

HDFC bank जॉबसाठी मुले-मुलींची डायरेक्ट भर्ती पगार 17500-35000, **7758908779** {NC251893}

मोठ्या प्रमाणात हाऊसकिपिंग पाहिजे. मुलुंड, कांदिवली, अंधेरी मालाड, संपर्क - **8097507698** {NC251899}

## Situation Vacant

Borivali (West) required Assistant Tally Accountant 2 years' experience. Resume: **9892797851.** {NC251811}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC251851}

## व्यवसायविषयक

शाळांना लागणारी स्टेशनरी बनवणाऱ्या नामवंत मॅन्युफॅक्चरींग कंपनीला मुंबई/ पालघर जिल्ह्यात कमिशन वरती काम करणारे विश्वासू पुरुष/ महिला पाहिजेत. ज्या ठिकाणी राहता त्याच विभागात काम करून महिन्याला लाखो रुपये कमवण्याची सुवर्णसंधी अधिक माहितीसाठी प्रत्यक्ष भेटाः **8693009342/ 9082787983** {NC251443}

## वधूवर मेळावा

वधु वर मेळावा सर्वजाती मुलींना फ्री APP कल्याण **9869868620** {NC251837}


# नाण्यांचा खणखणाट लयाला...

केवळ चलनाच्या रुपातूनच नाही तर भावनात्मक पातळीवरही नाण्यांना एक वेगळे महत्त्व आहे. मात्र डिजिटल भारतात नाण्यांचे अस्तित्व नाकारण्याचे प्रस्थ वाढले आहे. सध्याच्या युपीआयच्या झगमगटात आणि डिजिटल व्यवहाराने भारलेल्या जगात पैशाची देवाणघेवाण खूपच सुलभ झाली आहे. यामुळे एकेकाळी वैभवाचे, संपन्नत्तेचे प्रतिक असलेली नाणी कालबाह्य होताहेत.

**अलिकडेच** आरबीआयच्या अहवालात २०२३-२४ च्या तुलनेत २०२४-२५ मध्ये नाणी वापरण्याच्या प्रमाणात ३.६ टक्के वाढ नोंदल्याचे म्हटले आहे. विशेष म्हणजे २०१६-१७ या काळात ८.५ टक्के वाढ नोंदली गेलेली असताना काल परवाची वाढ ही नगण्यच म्हणावी लागेल. प्रामुख्याने याच काळात (२०१६-१७) युपीआय व्यवहारांची सुरुवात झाली होती. चालू आर्थिक वर्षात म्हणजे २०२४-२५ मध्ये नाण्यांच्या वापराचे मूल्य केवळ ९.६ टक्क्यांनी वाढले आणि ते २०१६-१७ च्या १४.७ टक्क्याच्या तुलनेत खूपच कमी आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या मते, मार्च २०१७ मध्ये युपीआयचे व्यवहार ६.४ दशलक्ष (२४२५ कोटी रुपये) वरून मार्च २०२५ मध्ये १८.३ अब्ज (२४,७७,२२१ कोटी रुपये) रुपयांवर पोहोचले. या आकड्यावरून युपीआयच्या आक्रमणासमोर नाणे धाराशयी होताना दिसते.

भारतात नाण्याचे महत्त्व केवळ चलनाच्या रुपातूनच किंवा आर्थिक व्यवहारापुरतेच मर्यादित नसून ते अर्वाचिन काळापासून शासन, सत्ता आणि ओळखीचे प्रतिक म्हणून पाहिले गेलेले आहे. मौर्यकाळातील नक्षीकाम असलेल्या नाण्यापासून ते गुप्त काळातील सोन्याच्या दिनारपर्यंत नाण्यावर राजघराण्यांच्या वंशांचा शिक्का राहिलेला आहे. ही नाणी एकप्रकारे सार्वभौमत्वाचे प्रतीक राहिली आहेत. तुघलक राजवटीत तांब्यापासून नाणी तयार केली जात असत. एक प्रकारे तुघलकाने चलनात नवीन प्रयोग करताना कलात्मकता आणि अस्थिरता या दोन्ही स्थितीचे दर्शन घडविले. नाणी ही नेहमीच धातूची नसतात. काही काळात चामड्यापासूनही नाणी तयार केली गेली. यामागे धातू उपलब्ध नसणे आणि टांकसाळीतून पुरेशा प्रमाणात निर्मिती नसणे हे कारण असले तरी नाण्यात खंड पडू दिला नाही. ही नाणी केवळ तत्कालिन काळात व्यापारासाठी वापरली गेली असली तरी पुढे जाऊन ती बदलत्या इतिहासाचे साक्षीदार बनली. यात निर्मात्यांची महत्त्वाकांक्षा आणि अभिरुची दिसून येते.



> **आरबीआयचा अहवाल पाहिल्यास युपीआय येण्यापूर्वी २०१५-१६ या काळात व्यवहारातील नाण्याचे मूल्य १२.४ टक्के आणि वापराचे प्रमाण ८.२ टक्क्यांनी वाढले होते. २०१६-१७ पर्यंत वाढीचा दर अनुक्रमे १४.७ टक्के अणि ८.५ टक्के होता. ही आकडेवारी नाण्यावर आधारित सक्षम अर्थव्यवस्थेची साक्ष देणारी होती. परंतु युपीआय आल्यानंतर व्यवहाराची दिशाच बदलली. २०२०-२१ मध्ये कोरोना महासाथीचा उद्रेक झाला आणि त्यात संपर्क विरहित पेमेंटला महत्त्व आले अणि त्यामुळे नाण्यांच्या मूल्यात केवळ २.१ टक्के आणि व्यवहारातील प्रमाणात केवळ एक टक्का वाढ नोंदली गेली. यानंतरच्या वर्षात २०२२-२३ आणि २०२३-२४ मध्ये नाणे वापरण्याच्या प्रमाणात अनुक्रमे २.६ टक्के आणि ३.५ टक्के वाढ नोंदली गेली. हे प्रमाण युपीआयपूर्वीच्या स्तराच्या तुलनेत खूपच कमी होते.**



• डॉ. संजय वर्मा
माध्यमतज्ज्ञ-अभ्यासक

नाणे आणि रुपयांच्या अनेक कथा आहेत. यात आधुनिक काळातील ब्रिटिश राजवटीतील नाण्यांचा उल्लेख करता येईल. त्यात एक आणा, दोन आणे देखील होते आणि वजनदार एक रुपयाही होता. तत्कालिन काळात रुपया देखील सर्वसामान्यांसाठी खूपच मोलाचा होता. भारतीय रुपयाचा स्वत:चा एक गौरवशाली इतिहास राहिलेला आहे. विसाव्या शतकाच्या मध्यात आपला रुपया ओमान, दुबई, कुवेत, बहारीन कतार, केनिया, युगांडा, सेचेल्स आणि मॉरिशसपर्यंत अधिकृत चलनाच्या रुपातून वापरला जात होता. या देशांकडे स्वत:चे नाणे असतानाही दीर्घकाळापर्यंत भारतीय रुपयाचा प्रभाव राहिला आहे. सोन्याच्या तस्करीला वेसण घालण्यासाठी १९६० च्या दशकात भारताने सुरू केलेला आखात रुपया (गल्फ रुपे) अनेक आखाती देशांत वापरला जात होता. १९६६ मध्ये रुपयाचे अवमूल्यन झाल्यानंतर त्यांनी स्वत:च्या चलनाला महत्त्व दिले. आज नेपाळ आणि भूतानमध्ये रुपयाला अधिकृत मान्यता आहे. अर्थात नेपाळमध्ये सध्या पाचशे रुपयांची नोट मान्य केली जात नाही. सिंगापूर, मलेशिया आणि श्रीलंकासारख्या देशांत भटकंतीला गेलेल्या भारतीय पर्यटकांचा रुपया स्वीकारला जातो. यावरून आपल्या चलनाची प्रतिष्ठा लक्षात येते.

भारताने १९५० मध्ये पहिल्यांदा स्वत:च्या नाण्याची पायाभरणी केली होती, हे लक्षात घ्यावे लागेल. महात्मा गांधी श्रेणीतील आधुनिक नोटांची सुरुवात १९९६ मध्ये झाली आणि २०१० मध्ये रुपयाचे नवे (र) प्रतीक स्वीकारण्यात आले. त्याचवर्षी ७५, शंभर अणि एक हजार रुपयांची नाणी देखील आणली. अर्थात त्याकडे प्रामुख्याने संग्रहाच्या रुपातून पाहिले गेले. २०११ पर्यंत रुपयाचे चिन्ह असलेले नाणे दैनंदिन वापरात आले. त्याचा खणखणाट बाजार आणि मंदिरातील देणगीपेटीत होऊ लागला.

आर्थिक व्यवहारासाठी डिजिटल तंत्राचा वापर आणि नाण्यांची कालबाह्यता ही एप्रिल २०१६ मध्ये लाँच केलेल्या युपीएआयमुळे निश्चित झाली. आज तीन चार रुपये देखील क्युआर कोडने ट्रान्सफर होऊ लागल्याने नाण्याची गरज संपली. नाण्यांचा खणखणाट हा भारतीय समाज आणि बाजाराचा आवाज होता. आज तो काळाच्या उदरात गुडूप झाला आहे. परंतु जुन्या, बुजूर्ग लोकांसाठी नाणे केवळ चलन नसून ते संघर्ष आणि आशेचे प्रतिक आहे. परंतु तंत्रज्ञानाचा वरवंटा आपली सांस्कृतिक मूल्ये, स्मृती पुसून टाकत वेगाने फिरत आहे. आज नाण्यांबाबत जे घडते आहे ते येणाऱ्या काळात नोटांबाबतही घडू शकते. कृत्रिम बुद्धिमत्तेची त्सुनामी आल्यानंतर जुन्याच नव्हे तर वर्तमानातील अनेक गोष्टींची पडझड होऊन त्या इतिहासजमा होणार आहेत. या बदलांचे साक्षीदार होताना कालबाह्य झालेल्या गोष्टींचे शल्य सर्वांच्याच मनात राहील.

# यवतमाळमध्ये पोलिसाची गळफास घेऊन आत्महत्या

■ यवतमाळ

यवतमाळमधील विठ्ठलवाडी परिसरात एका पोलीस कर्मचाऱ्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. सचिन नारखेडे (३४) असे त्याचे नाव आहे. तो यवतमाळ पोलीस मुख्यालयातील मोटार परिवहन विभागात चालक म्हणून कार्यरत होता.

काल सकाळच्या सुमारास त्यांची पत्नी आणि आई घराच्या अंगणात कामे करीत होत्या. त्यांचा मुलगाही अंगणात खेळत होता. त्यावेळी त्यांनी घरातील एका खोलीत छताला दोर बांधून गळफास घेतला.

काही वेळाने हा प्रकार कुटुंबियांच्या लक्षात आला. त्यांनी आरडाओरड करून शेजाऱ्यांना मदतीसाठी बोलावले. या घटनेची माहिती शहर पोलिसांना मिळताच ते घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला.

सचिन यांनी असे टोकाचे पाऊल का उचलले, याचा तपास पोलीस करत आहेत. सचिन यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, मुलगा, असा परिवार आहे.

# पुणे विमानतळावर विमानाला पक्षी धडकल्याने उड्डाण रद्द

■ पुणे

**पुण्याहून** भुवनेश्वरच्या दिशेने झेपावणाऱ्या एअर इंडियाच्या (आयएक्स -१०९८) विमानाला उड्डाणाच्या क्षणी पक्षाची धडक बसली. ताशी २८० किलोमीटर वेगाने चालणाऱ्या विमानाच्या उजव्या बाजूच्या इंजिनमध्ये पक्षी शिरल्याने सात ब्लेडचे नुकसान झाले. वैमानिकाने प्रसंगावधान राखत वेळेत विमान उतरवल्याने १४० प्रवाशांचे प्राण वाचले.



पुण्याहून दुपारी ४ वाजून १० मिनिटांनी विमान भुवनेश्वरसाठी उड्डाण करणार होते. विमान धावपट्टीवर आल्यानंतर उड्डाण घेण्याच्या आधीच काही सेकंद विमानाच्या उजव्या इंजिनला पक्षाची धडक बसली. यात पक्षी आत ओढला गेल्याने इंजिनचे नुकसान झाले. यावेळी वैमानिकाला मोठा आवाज आल्याने विमान तपासण्यासाठी थांबवण्यात आले. यावेळी इंजिनचे मोठे नुकसान झाल्याचे एअर इंडियाच्या पथकाला आढळून आले. वैमानिक व हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाला माहिती देण्यात आली. प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवण्यात आले.

# आजचे राशी भविष्य

शुक्रवार दि. ८ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | मोठ्या उत्साहाने कामे हाती घ्याल. स्वतःचे छंद जोपासण्यासाठी वेळ काढाल. धार्मिक सहलीचे आयोजन कराल. |
| वृषभ | कामाची घाईगडबड करू नका. कामाचे नियोजन करणे महत्त्वाचे राहील. आर्थिक लाभ चांगले राहतील. |
| मिथुन | मनामध्ये मोठे प्रकल्प करून दाखवण्याची जिद्द राहील. सहकारी वर्गाशी जुळवून घ्यावे लागेल. प्रवासात सतर्क रहा. |
| कर्क | नोकरीत कामाचा ताण कमी होईल. कलाकारांना प्रोत्साहन मिळेल. एखाद्या समारंभात सहभागी व्हाल. |
| सिंह | महत्त्वाच्या कामात सफलता मिळेल. एकावेळी अनेक कामे करण्याकडे कल राहील. सामाजिक कार्यात सहभागी व्हाल. |
| कन्या | नोकरीत अनुकूल वातावरण राहील. सामाजिक क्षेत्रात नावलौकिक वाढेल. प्रिय व्यक्तीशी संपर्क साधाल. |
| तूळ | कार्यक्षेत्रात नवीन संधी चालून येतील. तुमच्या बोलण्याने कामे सहज पार पडतील. संततीशी सुसंवाद साधा. |
| वृश्चिक | कामानिमित्त प्रवास घडू शकतो. नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राखावी लागेल. जोडीदाराचे आर्थिक सहकार्य राहील. |
| धनु | मनात सकारात्मक विचार राहतील. घरातील सदस्यांबरोबर आनंदाने दिवस घालवाल. जुनी गुंतवणूक फायदेशीर ठरेल. |
| मकर | जोडीदाराच्या सहकार्याने अडचणींवर मात कराल. नोकरीत तुमचे कौशल्य सिद्ध कराल. आर्थिक लाभ मिळतील. |
| कुंभ | नोकरीमध्ये कामाचा ताण जाणवेल. मुलांच्या यशाच्या वार्ता समजतील. कुटुंबीयांसाठी अधिक खर्च कराल. |
| मीन | अडचणींवर मात करण्यासाठी अधिक परिश्रम घ्याल. घरामध्ये धार्मिक वातावरण राहील. नोकरीतून आर्थिक लाभ होतील. |

## महाराष्ट्र गजलक्ष्मी गुरु विकली लॉटरी

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 32 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 07/08/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-04 : 9575** — अंबिका एजन्सी - दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0425 | 1710 | 2802 | 3127 | 3149 | 6267 | 6619 | 7683 | 7968 | 9145 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1262 | 2145 | 3814 | 5451 | 6244 | 6388 | 6600 | 7685 | 7770 | 8781 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0547 | 1606 | 1616 | 2543 | 2825 | 3371 | 3688 | 4398 | 5934 | 6847 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| पाचवे बक्षिस रु. | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 300/- | 1143 | 2225 | 2911 | 3731 | 4970 | 5767 | 6768 | 7671 | 8608 | 9290 |
| 0011 | 1161 | 2229 | 3014 | 3772 | 5006 | 5789 | 6769 | 7697 | 8658 | 9292 |
| 0014 | 1162 | 2240 | 3017 | 3773 | 5042 | 5903 | 6876 | 7714 | 8758 | 9339 |
| 0015 | 1168 | 2245 | 3033 | 3787 | 5053 | 5960 | 6895 | 7717 | 8787 | 9379 |
| 0068 | 1377 | 2342 | 3040 | 3796 | 5086 | 6008 | 6953 | 7723 | 8795 | 9388 |
| 0073 | 1394 | 2345 | 3103 | 3806 | 5117 | 6021 | 7011 | 7727 | 8822 | 9398 |
| 0134 | 1412 | 2377 | 3109 | 3878 | 5160 | 6037 | 7058 | 7740 | 8837 | 9405 |
| 0150 | 1414 | 2422 | 3296 | 3894 | 5252 | 6065 | 7078 | 7771 | 8842 | 9559 |
| 0168 | 1467 | 2428 | 3353 | 3937 | 5295 | 6125 | 7171 | 7777 | 8860 | 9573 |
| 0221 | 1481 | 2525 | 3387 | 4143 | 5307 | 6184 | 7183 | 7796 | 8870 | 9613 |
| 0290 | 1489 | 2556 | 3393 | 4240 | 5355 | 6207 | 7192 | 7927 | 8881 | 9644 |
| 0618 | 1618 | 2582 | 3396 | 4264 | 5395 | 6493 | 7199 | 7983 | 8924 | 9660 |
| 0735 | 1661 | 2592 | 3428 | 4405 | 5434 | 6546 | 7235 | 8052 | 8938 | 9666 |
| 0764 | 1716 | 2607 | 3435 | 4413 | 5472 | 6548 | 7346 | 8066 | 8959 | 9734 |
| 0770 | 1784 | 2642 | 3441 | 4462 | 5530 | 6589 | 7462 | 8284 | 9020 | 9747 |
| 0861 | 1787 | 2706 | 3531 | 4469 | 5555 | 6602 | 7535 | 8287 | 9117 | 9768 |
| 0890 | 1814 | 2745 | 3543 | 4574 | 5559 | 6622 | 7597 | 8339 | 9126 | 9858 |
| 0914 | 1853 | 2827 | 3627 | 4638 | 5636 | 6666 | 7602 | 8403 | 9128 | 9918 |
| 0920 | 2032 | 2839 | 3628 | 4639 | 5644 | 6677 | 7628 | 8481 | 9163 | 9958 |
| 0950 | 2126 | 2858 | 3637 | 4852 | 5648 | 6678 | 7633 | 8488 | 9240 | 9977 |
| 1137 | 2182 | 2887 | 3727 | 4890 | 5738 | 6763 | 7636 | 8521 | 9262 | 9999 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. ८/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ० | ५ | ६ |
| ०१ | ५१ | ६० |
| ०६ | ५६ | ६५ |
| १४५ | २६७ | २६८ |
| २५० | ३४८ | ३४९ |

## लॉटरी

## आकर्षक पुष्कराज विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत दर गुरुवारी — तिकीट किंमत रु. 50/- — सोडत क्र. 32 — सोडत दिनांक 07/08/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 8 लाख — **AP-05 : 7341**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **1603** — लकी लॉटरी - अहमदनगर; ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

| बक्षिस | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1163 | 1167 | 1340 | 1747 | 2183 | 3958 | 6354 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1133 | 2951 | 4801 | 4959 | 5154 | 5062 | 6690 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1007 | 2063 | 2287 | 3305 | 5468 | 6761 | 7323 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1191 | 1486 | 2241 | 2812 | 4071 | 5624 | 6350 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| सातवे बक्षीस | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1960 | 2424 | 3017 | 3463 | 4040 | 4462 | 4949 | 5501 | 5985 | 6615 | 7070 | 7708 |
| | | 1992 | 2439 | 3019 | 3484 | 4044 | 4464 | 4961 | 5519 | 5988 | 6618 | 7078 | 7711 |
| | | 2011 | 2452 | 3023 | 3488 | 4046 | 4483 | 4962 | 5530 | 5990 | 6642 | 7111 | 7715 |
| 1006 | 1373 | 2021 | 2477 | 3025 | 3496 | 4059 | 4487 | 4970 | 5539 | 6004 | 6647 | 7141 | 7716 |
| 1012 | 1378 | 2025 | 2482 | 3038 | 3504 | 4075 | 4488 | 4974 | 5552 | 6036 | 6649 | 7176 | 7718 |
| 1016 | 1390 | 2026 | 2496 | 3039 | 3507 | 4084 | 4490 | 4986 | 5559 | 6067 | 6658 | 7187 | 7728 |
| 1019 | 1407 | 2040 | 2518 | 3040 | 3519 | 4088 | 4499 | 5009 | 5564 | 6086 | 6663 | 7192 | 7729 |
| 1020 | 1411 | 2052 | 2521 | 3046 | 3531 | 4091 | 4534 | 5027 | 5565 | 6087 | 6674 | 7197 | 7742 |
| 1028 | 1428 | 2056 | 2529 | 3093 | 3535 | 4095 | 4544 | 5040 | 5578 | 6096 | 6676 | 7222 | 7751 |
| 1080 | 1429 | 2059 | 2532 | 3109 | 3544 | 4108 | 4574 | 5056 | 5583 | 6116 | 6684 | 7265 | 7764 |
| 1095 | 1431 | 2108 | 2552 | 3117 | 3553 | 4111 | 4590 | 5075 | 5588 | 6128 | 6687 | 7267 | 7767 |
| 1100 | 1449 | 2112 | 2556 | 3133 | 3579 | 4123 | 4594 | 5095 | 5596 | 6143 | 6691 | 7270 | 7769 |
| 1101 | 1464 | 2122 | 2563 | 3174 | 3581 | 4131 | 4624 | 5125 | 5600 | 6155 | 6701 | 7273 | 7770 |
| 1102 | 1465 | 2128 | 2589 | 3183 | 3588 | 4193 | 4633 | 5132 | 5606 | 6161 | 6729 | 7322 | 7778 |
| 1106 | 1481 | 2148 | 2605 | 3198 | 3623 | 4199 | 4638 | 5153 | 5632 | 6227 | 6746 | 7326 | 7780 |
| 1114 | 1521 | 2203 | 2648 | 3203 | 3731 | 4203 | 4640 | 5177 | 5648 | 6246 | 6752 | 7327 | 7781 |
| 1132 | 1571 | 2204 | 2667 | 3216 | 3732 | 4242 | 4644 | 5195 | 5658 | 6248 | 6758 | 7337 | 7793 |
| 1140 | 1601 | 2208 | 2716 | 3253 | 3741 | 4243 | 4654 | 5241 | 5668 | 6255 | 6776 | 7374 | 7794 |
| 1149 | 1617 | 2227 | 2740 | 3254 | 3759 | 4258 | 4669 | 5247 | 5681 | 6260 | 6793 | 7379 | 7829 |
| 1150 | 1636 | 2229 | 2771 | 3279 | 3769 | 4268 | 4670 | 5276 | 5685 | 6275 | 6809 | 7390 | 7832 |
| 1157 | 1646 | 2236 | 2782 | 3290 | 3775 | 4288 | 4693 | 5285 | 5695 | 6279 | 6819 | 7436 | 7837 |
| 1163 | 1669 | 2240 | 2822 | 3298 | 3799 | 4298 | 4694 | 5302 | 5696 | 6292 | 6827 | 7456 | 7839 |
| 1165 | 1690 | 2244 | 2824 | 3303 | 3825 | 4308 | 4705 | 5315 | 5717 | 6362 | 6866 | 7467 | 7846 |
| 1169 | 1721 | 2247 | 2827 | 3307 | 3830 | 4309 | 4779 | 5335 | 5754 | 6368 | 6867 | 7486 | 7847 |
| 1179 | 1726 | 2261 | 2832 | 3308 | 3865 | 4316 | 4781 | 5339 | 5785 | 6390 | 6877 | 7511 | 7858 |
| 1194 | 1782 | 2266 | 2834 | 3322 | 3870 | 4361 | 4793 | 5342 | 5795 | 6402 | 6879 | 7537 | 7870 |
| 1195 | 1808 | 2287 | 2858 | 3326 | 3883 | 4365 | 4804 | 5348 | 5805 | 6407 | 6891 | 7544 | 7873 |
| 1197 | 1810 | 2294 | 2892 | 3327 | 3919 | 4379 | 4806 | 5355 | 5819 | 6449 | 6897 | 7574 | 7876 |
| 1202 | 1814 | 2301 | 2896 | 3330 | 3922 | 4394 | 4831 | 5356 | 5821 | 6450 | 6910 | 7599 | 7897 |
| 1205 | 1818 | 2303 | 2912 | 3332 | 3931 | 4411 | 4841 | 5375 | 5843 | 6476 | 6924 | 7614 | 7898 |
| 1214 | 1849 | 2313 | 2919 | 3346 | 3932 | 4415 | 4842 | 5376 | 5844 | 6486 | 6959 | 7617 | 7918 |
| 1267 | 1867 | 2315 | 2921 | 3360 | 3945 | 4420 | 4843 | 5378 | 5855 | 6493 | 6961 | 7637 | 7942 |
| 1270 | 1870 | 2322 | 2925 | 3363 | 3954 | 4432 | 4848 | 5385 | 5878 | 6500 | 6962 | 7657 | 7947 |
| 1276 | 1891 | 2340 | 2952 | 3368 | 3958 | 4439 | 4869 | 5407 | 5891 | 6521 | 6986 | 7670 | 7962 |
| 1310 | 1911 | 2365 | 2978 | 3391 | 3964 | 4445 | 4884 | 5418 | 5900 | 6529 | 7002 | 7673 | 7963 |
| 1311 | 1918 | 2367 | 2983 | 3394 | 3989 | 4448 | 4886 | 5444 | 5909 | 6536 | 7010 | 7679 | 7969 |
| 1315 | 1919 | 2376 | 2992 | 3403 | 3993 | 4449 | 4894 | 5451 | 5916 | 6545 | 7028 | 7690 | 7972 |
| 1316 | 1931 | 2405 | 3003 | 3420 | 4012 | 4459 | 4917 | 5453 | 5958 | 6586 | 7037 | 7705 | 7977 |
| 1345 | 1933 | 2423 | 3010 | 3437 | 4020 | 4461 | 4945 | 5500 | 5959 | 6608 | 7039 | 7707 | 7987 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**

## गणेशलक्ष्मी गौरव विकली लॉटरी

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 32 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 07/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-00 : 1995**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/-: **6897** वैशाली लॉटरी - बोरिवली; **7861** मातोश्री एन्टरप्रायझेस, खामगाव; **7907** सिराज एन्टरप्रायझेस, नागपूर; **8916** न्यू जय अंबे लॉटरी भंडार, यवतमाळ; **8962** श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1525 | 2402 | 3300 | 3381 | 3443 | 4910 | 7480 | 7496 | 8274 | 8761 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0977 | 2533 | 3304 | 3644 | 6722 | 7990 | 8039 | 9184 | 9491 | 9704 |

पाचवे बक्षीस रु. 200/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0006 | 0498 | 1714 | 2467 | 3949 | 5159 | 6130 | 7072 | 8123 | 9267 |
| 0009 | 0553 | 1715 | 2662 | 3964 | 5250 | 6191 | 7355 | 8269 | 9349 |
| 0019 | 0586 | 1811 | 2811 | 3971 | 5278 | 6202 | 7360 | 8387 | 9371 |
| 0034 | 0611 | 1868 | 2815 | 4090 | 5465 | 6203 | 7405 | 8388 | 9379 |
| 0056 | 0745 | 1911 | 2927 | 4166 | 5515 | 6234 | 7443 | 8580 | 9499 |
| 0087 | 0851 | 1951 | 3197 | 4262 | 5534 | 6443 | 7452 | 8581 | 9581 |
| 0089 | 0865 | 2013 | 3350 | 4263 | 5550 | 6454 | 7458 | 8584 | 9595 |
| 0094 | 1012 | 2022 | 3354 | 4314 | 5579 | 6463 | 7580 | 8667 | 9630 |
| 0109 | 1188 | 2188 | 3452 | 4483 | 5725 | 6484 | 7659 | 8747 | 9635 |
| 0110 | 1213 | 2211 | 3539 | 4490 | 5820 | 6657 | 7701 | 8866 | 9750 |
| 0141 | 1276 | 2213 | 3557 | 4647 | 5882 | 6674 | 7711 | 8885 | 9891 |
| 0247 | 1320 | 2261 | 3694 | 4661 | 5918 | 6743 | 7795 | 9093 | 9908 |
| 0370 | 1397 | 2321 | 3777 | 4736 | 6016 | 6797 | 7907 | 9169 | 9953 |
| 0479 | 1487 | 2360 | 3793 | 5028 | 6031 | 6824 | 7913 | 9177 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री

निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — • दीपलक्ष्मी विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर गुरुवार • सोडत क्रमांक 32 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 07/08/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SD-07 : 3755**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 1000/- | 1028 | 1489 | 3109 | 3157 | 3418 | 3681 | 3850 | 4808 | 5106 | 5173 |
| तिसरे बक्षिस रु. 500/- | 2136 | 2610 | 3139 | 3206 | 3337 | 3482 | 4105 | 4578 | 4605 | 5471 |

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1209 | 2139 | 3303 | 4287 | 5323 |
| 1352 | 2214 | 3423 | 4402 | 5331 |
| 1505 | 2270 | 3635 | 4420 | 5366 |
| 1653 | 2329 | 3809 | 4473 | 5426 |
| 1775 | 2370 | 3830 | 4640 | 5463 |
| 1812 | 2729 | 3903 | 4774 | 5536 |
| 1813 | 2759 | 3919 | 4801 | 5542 |
| 1823 | 2867 | 3935 | 4864 | 5555 |
| 1897 | 2928 | 4020 | 4879 | 5628 |
| 1929 | 3184 | 4145 | 5055 | 5814 |
| 2052 | 3206 | 4147 | 5082 | 5843 |
| 2136 | 3284 | 4159 | 5253 | 5924 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# ... तर विकासही कुपोषित होईल

गेल्या काही वर्षांपासून भारत हा अन्नधान्य उत्पादनामध्ये उत्तम प्रगती करतो आहे. एकेकाळी भारताला जगातल्या अनेक देशांकडून अन्नधान्य आयात करावे लागत होते. आज भारताकडे अन्नधान्याचा मोठा साठा असून, जगातील अनेक देशांना भारत अन्नधान्य निर्यात करतो. एवढेच नव्हे तर देशभरातल्या ८० कोटींपेक्षा जास्त लोकांना रेशन दुकानातून दर महिन्याला दहा किलो अन्नधान्य मोफत दिले जाते. म्हणजे देशाची अन्नधान्याची गरज भागवून शिवाय अडीअडचणीच्या काळात आवश्यक असलेला साठा कायम ठेवून अन्नधान्य देण्याइतपत भारताकडे क्षमता आहे. भारतीय लोकसंख्या आणि त्या सगळ्यांची अन्नधान्याची गरज भागवली जाणे हे सर्वात मोठे आव्हान ठरते. हे आव्हान पूर्ण करीत असताना अजूनही देशाच्या अनेक भागांत कुपोषणासारखी समस्या ठाण मांडून बसलेली दिसते. फार दूर जाण्याची गरज नाही. आपल्या महाराष्ट्रात जवळपास सगळ्याच जिल्ह्यांमध्ये गेल्या वर्षभरात कुपोषित बालकांची संख्या प्रचंड वाढलेली आहे. एकीकडे राज्याच्या विकास योजनांचा धडाका लावला जात असताना दुसरीकडे राज्यातील जवळपास प्रत्येक जिल्ह्यात कुपोषित बालकांची संख्या इतक्या वेगाने वाढावी हे अत्यंत धक्कादायक ठरते. मग एकूणच विकास योजनांमध्ये प्रत्येक नागरीकाच्या पोषण आहाराचा कितपत विचार होतो आहे याबद्दल शंका आहे. किंवा संबंधित घटकांपर्यंत हा पोषण आहार पोहोचू दिला जात नाही, असेदेखील म्हणावे लागते. अगदी अलिकडच्या ताज्या आकडेवारीप्रमाणे नाशिक जिल्ह्यात साडेचार हजार मुलं कुपोषित आहेत. धुळे, नंदुरबार, चंद्रपूर, पालघर, अशा काही जिल्ह्यांमध्ये ही समस्या अधिक तीव्र झालेली आहे. सतत प्रयत्न करूनही जर ही समस्या कमी होत नसेल तर गरजू लोकांपर्यंत आवश्यक तेवढा पोषण आहार पोहोचू दिला जात नाही असा त्याचा निष्कर्ष काढावा लागतो. खरे तर ग्रामपंचायत स्तरावर आर्थिक दुर्बल घटकांसाठी पुरेसे अन्नधान्य पोहोचण्याबाबत योजना राबवल्या जातात. तरीसुद्धा ही संख्या वाढत राहते. यावरून पोषक आहाराबरोबरच यासंदर्भातली जनजागृती पुरेशा प्रमाणात होत नाही. असादेखील त्याचा अर्थ निघतो. विशेषतः आदिवासी पाड्यांमध्ये रेशन दुकानांवरचे अन्नधान्य योग्य पद्धतीने पोहोचत नाही. आणि आदिवासींमध्ये यासंदर्भातली योग्य जनजागृती न केल्याने त्यांच्या नावे असलेल्या अन्नधान्याचा परस्पर पोबारा होतो.

**पोषण आहार पोहचतच नाही**

कुपोषित बालकांच्यासंदर्भात आरोग्यविषयक जनजागृतीदेखील तितकीच महत्त्वाची ठरते. या आदिवासी भागातल्या गर्भवती महिलांना योग्य त्या प्रमाणामध्ये पोषण आहार उपलब्ध होत नाही. त्या आदिवासींकडूनही याबाबत हलगर्जीपणा केला जातो. योग्यवेळी आरोग्यविषयक मदत न मिळाल्याने नवजात बालकांची काळजी घेण्याबाबतही अक्षम्य दुर्लक्ष होते. ग्रामीण भागातल्या किंवा आदिवासी परिसरात सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर चांगले उपचारही आवश्यक त्यावेळी उपलब्ध होत नाहीत. ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष करण्याचे प्रकार सातत्याने होत असतात. त्या भागातली निरक्षरता किंवा अर्धसाक्षरता हीदेखील या समस्येचे कारण ठरते. राज्याच्या अंदाज पत्रकामध्ये कुपोषण निर्मूलनासाठी पुरेशी तरतूद केलेली असते. त्यातल्या योजनांची अंमलबजावणी तितक्या प्रभावीपणे होत नाही. ज्या ग्रामीण भागात शहरी भागासाठी अनेक वस्तूंचा पुरवठा होतो. अगदी दूधसुद्धा मोठ्या प्रमाणावर शहराकडे रवाना होते. पण त्याच आदिवासी भागातल्या मुलांच्या पोषणासाठी आवश्यक तेवढे दूधही उपलब्ध होत नाही. त्यातला आश्चर्याचा भाग म्हणजे गेल्या तीस चाळीस वर्षांपासून कुपोषणाची ही समस्या भेडसावते आहे. दरवर्षी किमान दहा ते पंधरा हजार मुलं कुपोषणाने दगावतात. चंद्रपूर जिल्ह्यातल्या या कुपोषणाविरोधात डॉ. अभय बंग यांनी मोठी मोहीम सुरू केली होती. जवळपास वीस वर्षांपूर्वी राज्यातल्या सगळ्या आदिवासी भागांत पंचवीस हजार मुलं दगावल्याचेही निदर्शनास आले होते. या प्रकारानंतर सरकारी पातळीवर थोडीफार हालचाल झाली. नव्याने काही योजना समाविष्ट केल्या गेल्या. विशेषतः आरोग्य, आहार, यासंदर्भात त्या त्या समाजघटकांना थेट लाभ कसा होईल याचादेखील आराखडा तयार केला गेला. परंतु ही योजना पोहोचवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर असते. त्यांच्यावरच नियंत्रण नसल्याने या योजनांचा लाभ संबंधितांना मिळतो आहे की नाही, हे स्पष्ट होऊ शकत नाही.

**भ्रष्टाचाराचे कुरण**

केंद्र सरकार, राज्य सरकार या दोघांकडूनही वेगवेगळ्या योजना जाहीर होत असतात. परंतु त्या संबंधितांपर्यंत पोहोचूच दिल्या जात नाहीत ही त्यातली वस्तुस्थिती आहे. आज जरी या सगळ्या योजनांचा कठोरपणे आढावा घेतला तर त्यात चालणाऱ्या भ्रष्टाचाराचा खरा चेहरा समोर येईल. म्हणजे आदिवासी किंवा ग्रामीण भागातले हे कुपोषण भ्रष्टाचाराचे कुरण होते आहे. त्यातला आणखी एक गंभीर भाग म्हणजे त्या त्या भागातील लोकप्रतिनिधीसुद्धा या समस्येबाबत अत्यंत असंवेदनशील असतात. आपल्या मतदारसंघामध्ये कोणाचेही कुपोषण होणार नाही, याची काळजी लोकप्रतिनिधीनी घ्यायला हवी. परंतु तिथे चालणाऱ्या भ्रष्टाचाराला राजकीय संरक्षण मिळत राहते. आणि हे लोकप्रतिनिधीसुद्धा इतक्या गंभीर समस्येबाबत सोयीस्करपणे मौन बाळगून असतात. म्हणूनच विकासाचे धोरण राबवताना राज्यातला दहा ते पंधरा टक्के समाज कुपोषणासारख्या समस्येने ग्रस्त असेल तर त्या विकासाला कधीच परिपूर्णता येऊ शकणार नाही. विकास या संकल्पनेमध्ये गरीब किंवा सामान्य माणसाचाच सर्वप्रथम विचार झाला पाहिजे. केवळ पायाभूत सुविधा निर्माण केल्या म्हणजे विकास ठरत नाही. कारण मूलभूत सुविधांपासून वंचित असणारा समाज विकास प्रक्रियेत सहभागी करून घेतले जात नाही, असा त्याचा अर्थ होतो. ही समस्या तर अशीच कायम राहिली तर तो विकासही कुपोषितच राहील. जोपर्यंत प्रत्येकाच्या मूलभूत गरजांची पूर्तता होत नाही, तोपर्यंत विकासाला परिपूर्णता येणार नाही.


**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**दिवसभराच्या कष्टाने माणूस एवढा थकत नाही
जेवढा राग आणि चिंतेने थकतो.**

**पंचांग**

**शुक्रवार, ८ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**



**श्रावण शुक्ल चतुर्दशी**
**नक्षत्र : उत्तराषाढा**

**रवी उदय- ०६-१९**
**रवी अस्त- १९-०९**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मकर**

**नारळी पौर्णिमा; श्रवणा कर्म; बुधाचा पहाटे पूर्वेला उदय; वरदलक्ष्मी व्रत; जरा-जिवंतिका पूजन; पौर्णिमा प्रारंभ दुपारी २.१२**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



## खजूर फालुदा



★ **साहित्य** - सात- खजूर, १/३ कप-मिक्स केलेली ड्रायफ्रूट्स, अर्धा टेबलस्पून- टुटीफ्रुटी, १/३ कप- खसखस सिरप, १/३ कप- भाजलेली मखाना पावडर, ३/४ कप- वाफवलेला साबुदाणा, अर्धा कप- चिरलेली ताजी फळे, तुमच्या आवडीचे कोणतेही आईस्क्रीम, दीड टेबलस्पून- भिजवलेले खरबूज बिया

★ **कृती** - सर्वात आधी खजूर गरम दुधात तीस मिनिटे भिजवा. नंतर मिक्सर ग्राईंडरमध्ये बारीक बारीक करा. आता एका पॅनमध्ये दूध गरम करा. नंतर भाजलेले मखाना घाला आणि थोडा वेळ शिजवा. आता दूध थोडे थंड होऊ द्या. नंतर खजूर पेस्ट आणि खसखस सिरप घाला आणि थंड होण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवा. आता सर्वप्रथम सर्व्हिंग ग्लासमध्ये थोडे खसखस सिरप घाला. नंतर त्यात खरबूज बिया घाला. आता त्यात केशर पिस्त्याचा आईस्क्रीम घाला. आता साबुदाणा, चिरलेली सुका मेवा घाला. आता चिरलेली ताजी फळे घाला. व खसखस दूध घाला आणि नंतर खरबूज बिया आणि साबुदाणा घाला आणि पुन्हा वर दूध घाला. आता शेवटी अर्धा स्कूप आईस्क्रीम घाला आणि चिरलेली सुका मेवा, डाळिंब बियाणे आणि टुटी-फ्रुटीने सजवा. तर चला तयार आहे आपला खजूर फालुदा.



# पाकिस्तानी हॉकी संघाचा भारतात खेळण्यास नकार
## आशिया हॉकी स्पर्धा! आता बांगलादेशला आमंत्रण

**बिहारच्या राजगीरमध्ये २७ ऑगस्टपासून आशिया चषक हॉकी स्पर्धा सुरू होणार आहे. सुरक्षेच्या कारणावरून भारतात हॉकीचा सामना खेळण्यास पाकिस्तानच्या हॉकी संघाने नकार दिला. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हॉकीचा सामना रद्द होणार आहे.**



■ कराची

**या** स्पर्धेत भारतासह ८ संघांचा समावेश आहे. पाकिस्तानच्या या निर्णयानंतर भारताच्या हॉकी व्यवस्थापनाने दुसऱ्या देशाला आशिया चषकाच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आमंत्रण दिले. भारताच्या हॉकी व्यवस्थापनाने सांगितले की, भारत सरकार पाकिस्तानच्या खेळाडूंना व्हिसा देण्यास तयार होती. मात्र, सुरक्षेचे कारण पुढे करत पाकिस्तान हॉकी महासंघाने भारतात येण्यास नकार दिला. या स्पर्धेसाठी भारताकडून बांगलादेशला आमंत्रण देण्यात आले आहे. सध्या भारत, चीन, जपान, मलेशिया, दक्षिण कोरिया, ओमान, चिनी, तैपेई या स्पर्धेत भाग घेणार आहे. या निर्णयामुळे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये चेन्नई आणि मदुराई येथे होणाऱ्या आगामी ज्युनियर विश्वचषकात पाकिस्तानी हॉकी संघाच्या सहभागावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पाकिस्तान हॉकी संघाचा शेवटचा भारत दौरा २०२३ मध्ये चेन्नई येथे झालेल्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी होता.

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील अंतर आणखी वाढले आहे. इतर प्रत्येक क्षेत्राप्रमाणे त्याचा क्रीडा जगतावरही परिणाम झाला आहे. भारतीय क्रिकेट संघही अनेक स्पर्धांमध्ये पाकिस्तानमध्ये सामने खेळण्यासाठी गेलाच नाही. त्यानंतर भारत विरुद्ध पाकिस्तान सामना तटस्थ ठिकाणी झाला. त्यानंतर सप्टेंबरमध्ये भारतात आशिया क्रिकेट चषक होणार होता. मात्र पाकिस्तानी संघाने आमचे सामने तटस्थ ठिकाणी खेळवण्याचा आग्रह धरला. त्यामुळे बीबीसीआयने आशिया क्रिकेट चषक खेळवण्याचा निर्णय आशिया क्रिकेट परिषदेला कळवला. त्यानंतर ही स्पर्धा सौदी अरेबियामध्ये खेळवण्यावर आशिया क्रिकेट परिषदेने शिक्कामोर्तब केले.

## म्बोको आणि नाओमी ओसाका आज अंतिम फेरीत भिडणार

■ ओटावा

**युवा** कॅनडाची बॅडमिंटनपटू व्हिक्टोरिया म्बोकोने उत्कृष्ट कामगिरी करत नॅशनल बँक ओपन टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत कझाकिस्तानच्या एलेना रायबाकिनाचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. १८ वर्षीय म्बोकोने रायबाकिनाचा १-६, ७-५,७-६ (४) असा पराभव केला. तिसऱ्या सेटमध्ये म्बोकोने मॅच पॉईंट वाचवला आणि रायबाकिनाची सर्व्हिस दोनदा ब्रेक करून सेट टायब्रेकरमध्ये नेला.

आता अंतिम फेरीत माबोको चार वेळा ग्रँड स्लॅम विजेती जपानची नाओमी ओसाका हिच्याशी लढेल, जिने दुसऱ्या उपांत्य फेरीत १६ व्या मानांकित क्लारा टॉसनचा ६-२, ७-६ (७) असा पराभव केला. ८५ व्या मानांकित माबोको तिचे पहिले डब्ल्यूटी ए टूर जेतेपद मिळवण्याच्या प्रयत्नात असेल.

## तिरंगी एकदिवसीय मालिकेसाठी अफगाणिस्तानचा संघ घोषित

■ काबूल

**अफगाणिस्तानने** तिरंगी एकदिवसीय मालिकेसाठी २२ सदस्यीय संघ जाहीर केला असून, फिरकीपटू रशिद खानकडे नेतृत्वाची धुरा सोपविली. पाकिस्तान आणि यजमान संयुक्त अरब अमिरात हे या तिरंगी मालिकेतील इतर दोन संघ आहेत.

स्टार बलुल्लाह ओझाइ, रहमानुल्लाह गुरबाझ, फझलहक फारूकी, मोहम्मद नबी यांनाही या संघात स्थान मिळाले आहे. गेल्या वर्षी झालेल्या आयसीसी टी-२० वर्ल्ड कपमध्ये अफगाणिस्तान संघाने बाद फेरी गाठली होती. त्यात या चौघांचाही कामगिरी मोलाची ठरली होती. युवा खेळाडू वफीउल्लाह ताराखिल, अब्दुल्लाह अहमदझाई आणि बशीर अहमद यांनी प्राथमिक स्थान मिळवले आणि निवड झाल्यास ते पहिल्या आंतरराष्ट्रीय कॅपसाठी शर्यतीत असू शकतात.

## कॅरमच्या प्रचार आणि विकासासाठी केंद्रीय क्रीडामंत्री मांडवीयांना साकडे

■ नवी दिल्ली

**कॅरमच्या** प्रचार आणि विकासासाठी महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष जितेंद्र शहा, सचिव अरुण केदार, अखिल भारतीय कॅरम महासंघ व आंतरराष्ट्रीय महासंघाचे माजी सचिव, हरियाणा कॅरम असोसिएशनचे सचिव एस. के. शर्मा, चंदिगढ कॅरम असोसिएशनचे सचिव महेश सेखरी व सेंट्रल सिव्हिल स्पोर्ट्स बोर्ड दिल्लीचे विजेंदर सिंग यांनी पार्लमेंट हाऊस, दिल्ली येथे केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीया यांची त्यांच्या दालनात भेट घेतली. या भेटीत कॅरम खेळाच्या व खेळाडूंच्या विविध समस्या मांडण्यात आल्या. त्यावर मनसुख मांडवीया यांनी यामध्ये लक्ष घालण्याचे व समस्यांचे निवारण करण्याचे आश्वासन दिले.

क्रीडामंत्र्यांनी दाखवलेल्या सकारात्मक भूमिकेमुळे कॅरम या खेळाचा आगामी मार्ग सुखकर होण्याच्या आशा पल्लवित झाल्या. स्पोर्ट्स गव्हर्नन्स बिलात असोसिएशनने केलेल्या सूचनांचा विचार केल्याबद्दल असोसिएशनच्या वतीने मानद सचिव अरुण केदार यांनी क्रीडा मंत्र्यांचे आभार मानले. भविष्यात एशियन, कॉमन वेल्थ व ऑलिम्पिकसारख्या खेळात कॅरम या भारतीय खेळाचा समावेश झाल्यास भारताच्या पदतालिकेत ६ सुवर्ण, ४ रौप्य व २ कांस्य पदकांची वाढ होऊ शकेल, असे केदार यांनी सांगितले.

## आंतर रुग्णालयीन क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

■ मुंबई

**गिरनार** चहा पुरस्कृत आणि मुंबई क्रिकेट असोसिएशन मान्यता प्राप्त आंतर रुग्णालयीन क्रिकेट स्पर्धेत ज्या रुग्णालयीन क्रिकेट संघांना सहभागी व्हायचे असेल अशा संघांनी अनिल बैकर यांच्याशी संपर्क करावा.

प्रथम येणाऱ्या १६ क्रिकेट संघांना स्पर्धेत प्रवेश देण्यात येईल. गेली ३१ वर्षे या स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. हुमाँयू जाफरी सरचिटणीस आणि मिलिंद सावंत खजिनदार आणि त्यांचे सहकारी हे स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अथक मेहनत घेत आहेत. फॉर्म पूर्ण भरून प्रवेश फीसहित स्वीकारण्याची शेवटची तारीख ३० ऑगस्ट २०२५ आहे.

## भारताविरुद्ध कसोटी, वनडे मालिका ऑस्ट्रेलियाच्या 'अ' संघाची घोषणा

■ सिडनी

**पुढील** महिन्यात भारतात २ अनधिकृत कसोटी आणि ३ एकदिवसीय मालिका खेळण्यासाठी ऑस्ट्रेलिया 'अ' संघाची घोषणा केली. दोन्ही चार दिवसांचे कसोटी सामने लखनौच्या एकाना स्टेडियमवर खेळवले जातील. त्यानंतर कानपूरमधील ग्रीन पार्क येथे एकदिवसीय मालिका होणार आहे. ऑस्ट्रेलियाचे संपूर्ण लक्ष २०२७ च्या सुरुवातीला होणाऱ्या पुढील बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी दौऱ्यासाठी उदयोन्मुख खेळाडूंना तयार करण्यावर आहे. ऑस्ट्रेलिया 'अ' संघाच्या १४ सदस्यीय चार दिवसीय संघात कूपर कॉनोली, टॉड मर्फी आणि नॅथन मॅकस्विनी यांचा समावेश आहे.एकदिवसीय सामन्यांसाठी कमी अनुभवी संघाची निवड करण्यात आली आहे. या संघातील पाच खेळाडू २१ वर्षांखालील आहेत आणि एकही खेळाडू २६ वर्षांपेक्षा जास्त वयाचा नाही. बहुतेक रेड बॉल खेळाडू शेफील्ड शिल्ड हंगामाच्या पहिल्या फेरीसाठी मायदेशी परततील. २६ सप्टेंबर रोजी भारत 'अ' विरुद्धचा दुसरा चार दिवसांचा सामना संपल्यानंतर एका आठवड्याने ४ ऑक्टोबरपासून ही स्पर्धा सुरू होईल.

## सुशील इनामदार यांचे सुयश

■ ठाणे

**ठाणे** जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे ज्येष्ठ प्रशिक्षक आणि तांत्रिक अधिकारी सुशील इनामदार जागतिक ॲथलेटिक्स महासंघाची ब्रॉन्झ लेव्हल पंच परीक्षा उत्तीर्ण झालेत. ही परीक्षा पास होणारे सुशील इनामदार हे ठाण्यातील पहिले आणि महाराष्ट्रातील चौथे तांत्रिक अधिकारी आहेत. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे सुशील इनामदार यांना आशियाई देशांमध्ये होणाऱ्या मैदानी स्पर्धांमध्ये तांत्रिक अधिकारी म्हणून सहभागी होता येणार आहे. सुशील इनामदार गेली ३५ वर्षे या क्षेत्रात कार्यरत असून, त्यांनी राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील विविध मैदानी स्पर्धांमध्ये तांत्रिक अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. पुण्यात झालेल्या युवा राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धेदरम्यान दिवंगत राज्यसभा सदस्य सतिश प्रधान यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या देशव्यापी बॅटन दौडकरता मोलाची भूमिका बजावली होती.

## पाकिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी वेस्ट इंडिजचा संघ जाहीर

■ कराची

**पाकिस्तानविरुद्धच्या** ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी उद्यापासून वेस्ट इंडिजने आपला संघ जाहीर केला. यावेळी वेगवान गोलंदाज अल्झारी जोसेफला विश्रांती देण्यात आली, तर अष्टपैलू रोमारियो शेफर्ड एकदिवसीय संघात परतला.

जोसेफला यापूर्वी पाकिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेतही विश्रांती देण्यात आली होती. त्याच्या कामाचा ताण लक्षात घेऊन संघ व्यवस्थापन त्याला वारंवार विश्रांती देत आहे. त्यावेळी रोमारियो शेफर्डने शेवटचा एकदिवसीय सामना डिसेंबर २०२४ मध्ये खेळला होता. यावर्षी इंग्लंड आणि आयर्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत तो संघाचा भाग नव्हता. मालिकेतील तिन्ही सामने ८, १० आणि १२ ऑगस्ट रोजी त्रिनिदादमधील ब्रायन लारा क्रिकेट अकादमीमध्ये खेळवले जातील. वेस्ट इंडिज सध्या एकदिवसीय क्रमवारीत १० व्या स्थानावर आहे आणि २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकासाठी थेट पात्रता मिळविण्यावर त्यांचे लक्ष आहे.

वेस्ट इंडिज एकदिवसीय संघः शाई होप (कर्णधार), ज्वेल अँड्र्यु, जेडिया ब्लेड्स, कीसी कार्टी, रोस्टन चेस, मॅथ्यू फोर्ड, जस्टिन ग्रीव्हज, आमिर जांगू, शमार जोसेफ, ब्रँडन किंग, एविन लुईस, गुडाकेश मोती, शेरफेन रुदरफोर्ड, जेडेन सील्स, रोमारियो शेफर्ड.



# बॉलीवुड सिंगर, कंपोजर, सॉन्ग राइटर

# मीका सिंग



**'शेक दैट बूटी..', 'ए गणपत...चल दारू ला', 'बिट्टू सबकी लेगा रे...', 'इश्क की मां की', 'सारी दुनिया मेरे इस पे' यांसारख्या कॉन्ट्रोव्हर्शिअल गाण्यांना स्वरबद्ध करुन आपला बिनधास्तपणा दाखवणारा आणि 'इब्ने-बतूता', 'ढिंका चिका', 'बन गया कुत्ता' आणि 'दिल में बजी गिटार' यांसारख्या गाण्यांना आपला अन-कन्वेंशनल आवाज देऊन सर्वांचे लक्ष वेधून घेणारा गायक मिका सिंग इंडस्ट्रीतील अशा गायकांपैकी एक आहे, ज्याचे एक गाणे सिनेमाच्या यशाला मोठा हातभार लावत असते. मस्तमौला अंदाज, अन-कन्वेंशनल आवाज आणि वादविवादांशी जुने नाते, हीच कदाचित मिकाची खरी ओळख आहे. मिका कितीही वादात अडकला असला तरी त्याची लोकप्रियता तीळमात्रही कमी झालेली नाही.**

मिकाचे वडील अजमिर सिंग हे संगीतकार होते. त्यांना सहा मुले. त्यापैकी दलेर मेहंदी सर्वात मोठा, तर मिका सर्वात छोटा. त्याचं खरं नाव अमरिक सिंग. दलेर मेहंदीने 'बोलो तारा रारा' करत एक काळ गाजवला होता. वेग, भन्नाट वेग हे त्याचे हत्यार होतं. त्याच्या लोकप्रियतेसमोर हा छोटा भाऊ झाकोळला जाण्याची शक्यता होती. पण त्यातून मिकाने मार्ग काढला. मिका लहानपणीच तबला, हार्मोनियम, गिटार वाजवायला शिकला. शीख लोकात भक्तिभावाने कीर्तन गात असतात, तिथून सुरुवात करून त्याने भांगडा व पॉप गायक कलाकार म्हणून नाव मिळवले. अगदी सुरुवातीला त्याने दिल्लीत रामलीलामध्ये हार्मोनियम व गिटार वाजवून पैसे मिळवले. बॉलिवूडमध्ये आज कॉन्ट्रोव्हर्सी किंग मिका सिंगला मोठी मागणी आहे. एका काळ असा होता, जेव्हा लोक त्याचे तोंड बघणेही पसंत करत नव्हते. मात्र मिकाने आपल्या आवाजाच्या बळावर स्वतःची ही इमेज पुसून काढली.

मिका सिंग आपल्या भावाच्या बँडमध्ये गिटारिस्ट म्हणून काम सुरु केले होते. मिका सिंगने दलेर यांच्यासाठी 'डर दी रब रब कर दी' हे गाणे कंपोज केले होते. त्यानंतर त्याने स्वतः पार्श्वगायन करण्याचा निर्णय घेतला. मात्र जेव्हा मिका रेकॉर्डिंग स्टुडिओत जायचा तेव्हा दलेर मेंहदीच्या नावावर संगीतकार, दिग्दर्शक त्याचे गाणे ऐकायला तयार तर व्हायचे, मात्र दुसऱ्याच क्षणी त्याचा अन-कन्वेंशनल आवाज ऐकून त्याला रिजेक्ट करायचेय मिकाला अनेकदा नकाराचा सामना करावा लागला. प्रत्येक ठिकाणी निराश झाल्यानंतर मिकाने स्वतःचा अल्बम काढण्याचा निर्मय़ घेतला. अल्बममधील 'सावन में लग गई आग' हे गाणे प्रेक्षकांच्या मनावर राज्य करतंय. त्यानंतर मिकाने आपल्या याच अन-कन्वेंशनल आवाजाच्या बळावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.

मिका सिंगने सलमान खान, शाहरुख खान, अक्षय कुमार यांच्या बरोबर 'वीरे दी वेंडिंग', 'पैडमेन', 'सीक्रेट सुपरस्टार', 'रईस', 'सुल्तान', 'बजरंगी भाईजान', 'एबीसीडी २', 'ग्रांड मस्ती' अशा चित्रपटात गाणी गायली आहेत. मिका ने हिंदी बरोबर पंजाबी, मराठी, बंगाली, तेलुगू व कन्नड भाषेत गाणी गायली आहेत.

मिकाचे 'गबरू', 'दुनाली', 'इश्क ब्रांडी' असे अनेक अल्बम गाजले आहेत.

२००६ मध्ये आयटम गर्ल राखी सावंतला मिकाने आपल्याच बर्थडे पार्टीत सर्वांसमोर किस केले होते. त्याच्या या लिपलॉकमुळे चांगलाच गोंधळ निर्माण झाला होता. या कारणामुळे राखी न्यायलयातसुद्धा गेली होती. अनेक दिवस हे प्रकरण मीडियात गाजले. नुकतेच हे प्रकरण मिटले आहे.

इतकेच नाही तर 'इस जंगल से मुझे बचाओ' या शोदरम्यान मिकाने अभिनेत्री आणि मॉडेल निगार खानलासुद्धा किस करुन वादाला तोंड फोडले होते. मिकाला लोकांनी माफी मागण्यास सांगितले होते, कारण त्याने टीव्ही रिॲलिटी शोमध्ये असे लाजिरवाणे कृत्य केले होते. मात्र मिकाला आपल्या वागण्यावर मुळीच पश्चाताप झाला नाही. विशेष म्हणजे मिकाने राखीची खिल्ली उडवण्यासाठी एक गाणेसुद्धा तयार केले होते. त्याचे शब्द होते, ऐ भाई तूने पप्पी क्यों ली'



# वेरूळच्या लेण्यांमध्ये पुन्हा गळतीने चिंता

■ संभाजीनगर

**जिल्ह्यातील** जगप्रसिद्ध वेरूळ लेणीत पाण्याची गळती होत आहे. वेरूळमधील ३२ क्रमांकाच्या लेणीत पाण्याची गळती होत आहे. पाण्याच्या गळतीमुळे आतील भित्तीचित्रे धोक्यात आली आहेत. गेल्या वर्षीही असाच प्रकार घडला होता.

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत वेरूळ लेण्यांचा समावेश आहे. येथे हिंदू, जैन आणि बौद्ध लेण्या पाहायला मिळतात. गेल्यावर्षी जैन गुहा क्रमांक ३२ मध्ये पाण्याची गळती दिसून आली होती. त्यानंतर काही दुरुस्तीचे काम करण्यात आले होते, परंतु ते पूर्णपणे प्रभावी झाले नाही. त्यामुळे आता पुन्हा पाणी गळू लागले आहे. त्यामुळे आतील भित्तीचित्रांना नुकसान होऊ शकते. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणच्या अधिकाऱ्यांनीही या गळतीची पुष्टी केली आहे. त्यांनी ही एक नैसर्गिक प्रक्रिया असल्याचे म्हटले आहे. परंतु तज्ज्ञांनी असे मत मांडले आहे की, जर वेळेत योग्य पावले उचलली गेली नाहीत तर ऐतिहासिक वारशाचे नुकसान होऊ शकते. वेरुळच्या लेण्या छत्रपती संभाजीनगरपासून सुमारे ३० किमी अंतरावर आहेत. येथे हिंदू, बौद्ध आणि जैन धर्माच्या कलांचा एक अनोखा संगम पहायला मिळतो.यातील बहुतेक लेण्या दगड कापून बनवल्या आहेत. त्यामध्ये कोरीवकाम, शिल्पकला आणि चित्रकलेचा अद्भूत नमुना पहायला मिळतो.



# काँग्रेसचे नेते गोपाल तिवारी यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल

■ पुणे

**पुण्यात** काँग्रेसचे नेते गोपाल तिवारी यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी तिवारी यांच्यासह एकूण सहा जणांवर कारवाई करण्यात आली आहे. पुण्यातील नारायण पेठेत रस्त्यावर फलक लावण्यावरून २ गटांत हाणामारी झाली होती. याप्रकरणी पोलिसांनी कारवाई करत सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला असून यात तिवारी यांचाही समावेश असल्याचे उघड झाले आहे. विनायक मित्र मंडळाचे कार्यकर्ते योगेश पेटकर मंडपवाले कलाटकर यांनी मुरलीधर हॉटेलजवळील रस्त्याच्या कडेला सूचना फलक लावला होता. यावेळी तिवारी व अन्य दोघांनी तो फलक काढण्याचा प्रयत्न केला. यावरून वाद झाला. या वादात एका गटातील २ तरुणांवर कोयत्याने वार झाल्याने ते जखमी झाले होते. या प्रकरणी तक्रार दाखल झाल्यानंतर ६ जणांवर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# सांगलीत पत्नीच्या मृत्यूच्या मानसिक धक्क्याने पतीचाही मृत्यू

■ सांगली

**पत्नीच्या** मृत्यूचा शोक अनावर झाल्याने तिच्या रक्षाविसर्जनाच्या दिवशीच हृदयविकाराच्या धक्क्याने पतीचाही मृत्यू झाला. ही घटना खानापूर तालुक्यातील आळसंद येथे घडली. पती-पत्नीच्या अशा आकस्मिक मृत्यूने संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत आहे.

२ ऑगस्ट रोजी आळसंद येथील सुनीता धनाजी जाधव (३७) यांचे अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या मृत्युचे दुःख सहन न झाल्याने त्यांचे पती धनाजी जाधव ( ४३) यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. काल सुनीता यांचा रक्षाविसर्जन विधी होता. परंतु रक्षाविसर्जनाच्या दिवशीच सुनिता जाधव यांचे पती धनाजी जाधव यांचाही मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई, दोन मुले, भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे.

# घोडबंदर रोड ४ दिवस एका बाजूने बंद राहणार

■ ठाणे

**ठाणे** आणि मीरा-भाईंदर शहरांना जोडणारा प्रमुख मार्ग असलेला घोडबंदर रोड ८ ते ११ ऑगस्ट दरम्यान, रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामामुळे एका बाजूने बंद ठेवण्यात येणार आहे. या काळात प्रवाशांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू शकतो, अशी शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

नीरा केंद्र ते फाऊंटन दरम्यानच्या मार्गावर मीरा-भाईंदर महानगरपालिका रस्त्याचे नूतनीकरण करणार आहे. काम सुरू असताना एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली राहील, तर दुसऱ्या मार्गिकेवर काम सुरू असेल. त्यामुळे प्रवासासाठी २० ते ४० मिनिटांचा अधिक वेळ लागू शकतो. अवजड वाहनांसाठी पवईमार्गे पर्यायी मार्ग ठेवण्यात आला आहे. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी एक रुग्णवाहिका व एक क्रेन दोन्ही बाजूंनी तैनात करण्यात आली आहे.

# इक्बाल मिर्चीच्या मालमत्तेवर कब्जा करणाऱ्याला अटक

■ मुंबई

**ड्रग** माफिया इक्बाल मिर्चीच्या मृत्यूनंतर त्याच्या मालकीच्या मालमत्तेवर बेकायदेशीर कब्जा केल्याप्रकरणी त्याचाच जुना मित्र आणि शेजारी अब्दुल कादर अली मोहम्मद (७५) याला मुंबई पोलिसांनी अटक केली.

गिरगाव येथील न्यू रौशन टॉकीज या थिएटरची मालकी मिर्चीच्या नावावर होती. आणि अंमलबजावणी संचालनालयाने २०२० मध्ये ती मालमत्ता जप्त केली होती. मात्र काही वर्षांपूर्वी कादरने ती मालमत्ता आपल्या नावावर हस्तांतरित करून १५ कोटी रुपयांना विकण्याचा प्रयत्न केला. ही बाब मिर्चीच्या मुलाच्या निदर्शनास आल्यानंतर, त्याने ईडीकडे अतिक्रमण हटवण्याची मागणी केली. ईडीने या प्रकरणाची चौकशी करून व्हीपी रोड पोलीस ठाण्यात फसवणूक, अतिक्रमण, आणि न्यायालयीन आदेशाचा अवमान अशा गंभीर गुन्ह्यांखाली तक्रार दाखल केली. त्यानंतर काल कादरला अटक करून न्यायालयात हजर केले. त्याला ८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाला एसआरए कार्यालय गती देणार

■ मुंबई

**मुंबईसह** उपनगरात वर्षानुवर्ष बंद असलेल्या झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाला एसआरए कार्यालय पुढाकार घेऊन अशा प्रकल्पांना गती देणार आहे. अधिक माहिती देताना अधिकाऱ्यांने सांगितले की, झोपडीधारक खासगी विकासकांच्या माध्यमातून झोपडपट्टी पुनर्विकासच्या प्रकल्पात सहभाग घेतात. शेकडोहून अधिक प्रकल्प बंद पडून आहेत. यामुळे हजारो कुटुंब हक्काच्या घरांशिवाय बेघर अवस्थेत आहेत. अशा बंदस्थितीत असलेल्या योजना मार्गी लावण्यासाठी एसआरए कार्यालयाने पुढाकार घेतला आहे. बंद पडलेल्या प्रकल्पांचे काम का रखडले. हे काम किती टक्के झाले आहे. यावर त्यावेळच्या विकासकांने किती खर्च केला आहे. आता हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती खर्च येऊ शकतो. याचा अभ्यास करण्यासाठी एसआरए प्राधिकरणाने तज्ज्ञ असलेल्या पाच कार्यकारी अभियंत्यांची नियुक्त केली आहे. त्यांच्या अभ्यास अहवालानुसार बंद असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नवीन विकासकांच्या नेमणुका केल्या जाणार आहेत. त्याचप्रमाणे पूर्वीच्या विकासकाचा प्रकल्पावर झालेल्या खर्चाचा परतावा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# सोलापुरात एसटी-मोटार अपघातात एकाचा मृत्यू

■ सोलापूर

**सोलापूर** जिल्ह्यातील माढा-कुर्डुवाडी आज सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास एसटी आणि मोटारीचा भीषण अपघात झाला. या अपघातात मोटारीतील संजय हुबाले (५०) प्रवाशाचा मृत्यू झाला. तर एसटीतील १५ प्रवासी जखमी झाले. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

कुर्डुवाडीच्या दिशेने जाणाऱ्या एसटीला विरुद्ध माढ्याच्या दिशेने येणार्या मोटारीने धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की मोटारीचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत मदतकार्य सुरू केले. मोटारीतील संजय हुबाले आणि यशवंत बेडगे यांना तातडीने मस्के रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच



हुबाले यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या अपघाताची माहिती मिळताच माढ्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर आणि त्यांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अपघाताचा पंचनामा करून या मार्गावरील वाहतूक सुरळीत केला.

# मंत्री दादा भुसे यांच्या दौऱ्यात पक्षाचे जिल्हाप्रमुख भिडले

■ गडचिरोली

**आगामी** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात पुन्हा एकदा राजकीय गटबाजी उफाळून आली आहे. आज शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या गडचिरोली दौऱ्यावेळी शिंदे गटातील दोन जिल्हाप्रमुख श्रेय वादावरून भिडले.

गडचिरोली येथील सर्किट हाऊसमध्ये पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्री दादा भुसे यांची बैठक पार पडली. त्यानंतर ते चंद्रपूरकडे रवाना होताच गडचिरोली जिल्हाप्रमुख संदीप ठाकूर आणि अहेरी जिल्हाप्रमुख राकेश बेलसरे यांच्यात श्रेयवादावरून वाद झाला. हा वाद इतका वाढला की त्यात हाणामारीपर्यंतची वेळ आली. स्थानिकांनी वेळेत हस्तक्षेप करत प्रकार थांबवला. या प्रकारामुळे शिंदे गटातील अंतर्गत मतभेद आणि गटबाजी उघड झाली असून, आगामी निवडणुकांच्या तोंडावर हा वाद पक्षासाठी डोकेदुखी ठरू शकतो.

# लेसर स्कॅनिंगने गणेशमूर्ती तयार! पुण्यात पहिलाच प्रयोग साकार

■ पुणे

**पुण्यातील** श्री गुरुदत्त तरुण मंडळाने यंदा थ्रीडी लेसर स्कॅनिंगचा वापर करून पहिल्यांदाच गणेश मूर्ती बनवली आहे. मूळ मूर्तीचे थ्रीडी स्कॅनिंग करून हुबेहुब बायोडिग्रेडेबल प्लास्टिकची मूर्ती बनवण्याचा पहिलाच प्रयोग यशस्वी झाला आहे. पुण्यातील कलाकार इंद्रजीत जोशी यांनी ही मूर्ती तयार केली आहे.

जोशी यांच्याकडे असलेल्या वायरलेस थ्रीडी स्कॅनरने मूळ मूर्तीचे स्कॅनिंग केले. या मशीनने मूळ मूर्तीवर असलेली अगदी बारीक नक्षीकाम सुद्धा टिपले असून त्यानंतर लेसर



प्रिंटिंगच्या साहाय्याने दुसरी मूर्ती तयार केली आहे. पुण्यात पहिल्यांदाच अशा प्रकारे मूर्ती बनवल्याचा दावा जोशी यांनी केला आहे. ते म्हणाले की, हे पुणे शहरातील एकमेव अत्याधुनिक मशीन आहे. एका गणेश मूर्तीची हुबेहूब मूर्ती बनवण्यासाठी कारागिरांना अनेक अडचणी येतात. यासाठी आम्ही ही लेसर मोड असलेली हायटेक स्कॅनर मशीन घेऊन आलो आहोत. मशीनला लावण्यात आलेला स्कॅनर हा आयआर मोडमध्ये कार्यान्वित आहे. ही मशीन मूर्तीवर असलेला पॉईंट डेटा गोळा करते. यामध्ये मूर्तीवर असलेले अगदी लहानातील लहान नक्षीकामसुद्धा मशीन टिपते. या मशीनच्या सहाय्याने आपण ३ इंचापासून १८ इंचापर्यंत मूर्ती बनवू शकतो. मूर्ती बनवताना पर्यावरणाला कुठलाही धोका होणार नाही याची काळजी आम्ही घेतलेली आहे. त्यामुळे आम्ही बायोडिग्रेडेबल प्लास्टिकचा वापर करतो.

# भुमरेंच्या चालकाची महसूल विभाग चौकशी करणार

■ मुंबई

**शिवसेना** शिंदे गटाचे खासदार संदीपान भुमरे यांच्या चालकाच्या नावावर १५० कोटी रुपयांची जमीन सालारजंग कुटुंबाने बक्षीस म्हणून दिली. या प्रकरणावरून आयकर विभागाकडून चौकशी सुरू आहे. यासंदर्भात राज्याच्या महसूल विभागात तक्रार दाखल झाल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, संदीपान भुमरे यांच्या चालकाबद्दल तक्रार आलेली आहे. ही मोठी तक्रार आहे. त्यामुळे अतिरिक्त मुख्य सचिवांना याबद्दल तपास करण्यास सांगितले आहे.

जीपी पारसिक सहकारी बँक लि.
कळवा, ठाणे - ४००६०५. (मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)
(रजि. नं. एमएससीएस/सीआर/१२१३/२०१५ दि.२६/०३/२०१५)

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

बँकेची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २४ ऑगस्ट, २०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता खालील विषयांकरिता **'डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह', हिरानंदानी मिडोज-२ जवळ, घोडबंदर रोड, मानपाडा-ठाणे (प.)- ४००६०७** येथे घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेपुढील विषय

१) दि. १ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या ५३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतांत वाचून कायम करणे.
२) वार्षिक अहवाल विचारार्थ ठेवणे व त्यास मंजुरी देणे ज्यामध्ये संचालक मंडळ अहवाल, दि. ३१ मार्च, २०२५ अखेरचा वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक यांचा समावेश आहे.
३) सन २०२३-२४ सालच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या दोषदुरुस्ती रिपोर्टला मान्यता देणे.
४) संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दि. ३१ मार्च, २०२५ अखेरच्या नफा वाटणीस व लाभांश वाटणीस मंजुरी देणे.
५) सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
६) सन २०२५-२६ करिता वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे सेवा शुल्क ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे. संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मे. एन. एस. गोखले ॲण्ड कंपनी चार्टर्ड अकौंटंटस् यांची सन २०२५ - २६ करिता वैधानिक लेखापरीक्षक म्हणून पूनर्नियुक्ती केली आहे.
७) मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ कलम ३९(३) अनुसार बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडे २०२४-२०२५ या आर्थिक वर्षअखेर येणेबाकी असलेल्या कर्जाची माहिती घेणे.
८) सर्वसाधारण सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर राहिल्यास त्यांची रजा मंजूर करणे.
९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**श्री. विजय मनोहर भोसले**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**दिनांक : ०८/०८/२०२५**
**ठिकाण : पारसिक नगर, कळवा, ठाणे-४००६०५.**

टिप : १) गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल व त्या सभेस पोटनियम क्र.३०(C) नुसार गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२) ज्या सभासदांना वार्षिक सभेस काही सूचना करावयाच्या किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. १६/०८/२०२५ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत त्यांच्या सूचना अथवा प्रश्न लेखी स्वरुपात द्यावेत. दि. १६/०८/२०२५ पर्यंत दिलेल्या मुदतीत लेखी स्वरुपात आलेल्या सूचना अथवा प्रश्नांचीच दखल घेण्यात येईल.
३) सभासदांव्यतिरिक्त अन्य कोणासही प्रवेश दिला जाणार नाही.
४) वार्षिक अहवाल व नोटीसची प्रत बँकेच्या वेबसाईट www.gpparsikbank.com वर प्रसारित केली आहे.
५) बँकेचा वार्षिक अहवाल आपल्या जवळच्या शाखेत उपलब्ध असून सभासदांनी घेऊन जावा.

# केम छो बारवर कारवाई पोलीस अधिकाऱ्याची बदली

■ मीरा रोड

**मुंबई-अहमदाबाद** राष्ट्रीय महामार्गालगत काशिमीरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या केम छो बारमधील अनैतिक कारवायांवर पोलीस आणि पालिका प्रशासनाने ४ ऑगस्ट रोजी कारवाई केली. या कारवाईत बारमधील गुप्त दरवाजे, अरुंद बोळ, कॅव्हिटी रूम आणि अलार्म सिग्नल यांचा पर्दाफाश करत उद्‌ध्वस्त करण्यात आले. ही कारवाई भाईंदर विभागाच्या अनैतिक मानवी वाहतूक कक्षाचे पोलीस निरीक्षक देविदास हंडोरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली होती. मात्र, या धाडसी कारवाईनंतर लगेचच काल रात्री त्यांच्या बदलीचे आदेश निघाले, ज्यामुळे पोलीस दलात आश्चर्य आणि संभ्रम निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, केम छो हा बार काशिमीरा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात असूनही, स्थानिक अधिकाऱ्यांनी कोणतीही ठोस कारवाई केली नव्हती. मात्र, देविदास हंडोरे यांनी ती कारवाई केली.

# मनसेच्या गोंधळानंतर पुणे मनपा कर्मचारी संपावर


■ पुणे

**पुणे** महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांनी आज मनसेच्या कार्यकर्त्यांकडून झालेल्या गोंधळाच्या निषेधार्थ कामबंद आंदोलन पुकारले. या दरम्यान कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून आपला निषेध नोंदवला. काल मनसेचे कार्यकर्ते पुणे महापालिकेत आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन देण्यासाठी आले होते. या निवेदनात, आयुक्तांच्या बंगल्यातून वस्तू गायब झाल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. यावेळी मनसे नेते किशोर शिंदे आणि आयुक्तांमध्ये वाद झाला. या घटनेनंतर मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिकेत ठिय्या आंदोलन करत आयुक्तांनी माफी मागावी, अशी मागणी केली. दोन ते तीन तास हा गोंधळ सुरू होता. अखेर पोलिसांनी हस्तक्षेप करत मनसेच्या पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेतले आणि त्यांच्यावर गुन्हा दाखल केला. या पार्श्वभूमीवर आज महापालिकेतील कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन करत आपला निषेध व्यक्त केला. महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी झालेले वर्तन निषेधार्ह आहे. आम्ही अशी राजकीय दादागिरी सहन करणार नाही, असे कर्मचाऱ्यांनी सांगितले. यावेळी सुरक्षेच्या दृष्टीने महापालिकेबाहेर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता आणि प्रत्येक व्यक्तीची तपासणी करूनच महापालिकेत प्रवेश दिला जात होता.

# वीकेण्डला काय बघाल ?

## सिनेमागृहात कोणते चित्रपट ?

### उदयपूर फाईल्स




अभिनेता विजय राजचा 'उदयपुर फाइल्स: कन्हैया लाल टेलर मर्डर' हा सिनेमा गेले अनेक दिवस वाद आणि कोर्ट केसमुळे चर्चेत राहिला होता. सुरुवातीला हा सिनेमा २७ जून रोजी प्रदर्शित होणार होता. इतकेच नाही तर या सिनेमाचे शीर्षक पूर्वी 'ज्ञानव्यापी फाईल्स' असे ठेवण्यात आले होते, त्यानंतर त्याची तारीख पुढे ढकलून ती ११ जुलै करण्यात आली होती. परंतु काही दिवसांपूर्वी दिल्ली हायकोर्टमध्ये एक याचिका दाखल करण्यात आली होती, ज्यामध्ये उदयपूर फाईल्सच्या प्रदर्शनावर बंदी आणण्याची मागणी करण्यात आली होती. त्यामुळे १० जुलै रोजी दिल्ली हायकोर्टाद्वारे या सिनेमाच्या प्रदर्शनावर बंदी घातली गेली होती. शेवटी, हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टमध्ये एक मोठी लढाई केल्यानंतर आता हा सिनेमा आज सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. या चित्रपटामध्ये विजय राजसह रजनीश दुग्गल, प्रीती झंगियानी, कमलेश सावंत, कांची सिंग आणि मुश्ताक खान यांच्या प्रमुख भूमिका आहेत. अमित जानी निर्मित व भरत श्रीनेत दिग्दर्शित या चित्रपटाला केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने (सीबीएफसी) १५० कट देण्यात आले आहेत.

**कथानक**

२८ जून २०२२ मध्ये गौस मोहम्मद आणि रियाज अत्तार नावाच्या दोन व्यक्ती राजस्थानच्या उदयपूर येथील टेलर कन्हैयालाल साहूच्या दुकानात कपडे शिवून घेण्यासाठी गेले. त्यावेळी कन्हैयालालने एका व्यक्तीचे नाव घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा दुसऱ्याने त्याला मारायला सुरुवात केली. कन्हैयालाल ओरडत होता आणि हल्ला करणाऱ्यांना सांगत होता की, 'असे करू नका,' परंतु त्याची गय केली गेली नाही. त्यानंतर कन्हैयालालला दुकानातून ओढत बाहेर आणले गेले आणि त्याचा गळा चाकूने कापला. या सर्व घटनेचा व्हिडिओ बनवून ते पळून गेले. त्यांनी तो व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला, ज्यामुळे देशामध्ये अस्वस्थता निर्माण झाली. मात्र, दोनच दिवसांत मारेकऱ्यांना अटक करण्यात आली. परंतु या घटनेमध्ये दहशतवादी कटकारस्थान असल्याच्या संशयामुळे केंद्रीय तपास संस्थेने हे प्रकरण आपल्या हातात घेतले, मात्र या अत्यंत क्रूर कृत्य करणाऱ्या मारेकर्यांना शिक्षा मिळाली नाही.

### हीर एक्सप्रेस





२०१२ मध्ये 'ओह माय गॉड' (OMG) सारखा चित्रपट बनवणारा दिग्दर्शक उमेश शुक्ला आता एक कौटुंबिक रोमँटिक चित्रपट घेऊन आला आहे. त्या सिनेमाचे नाव आहे 'हीर एक्सप्रेस'. आज हा सिनेमा प्रदर्शित होत आहे. या चित्रपटामध्ये आशुतोष राणा, गुलशन ग्रोवर, संजय मिश्रा हे ज्येष्ठ कलाकार असून दिविता जुनेजा आणि प्रीत कमानी हे नवोदित कलाकार नायक-नायिकेच्या भूमिकेत आहेत. बोगडाना ओरलीनोवा आणि अमांडा जेड कूपर यांनी देखील या सिनेमामध्ये काम केले आहे.

**कथानक**

या चित्रपटामध्ये एका महत्वाकांक्षी तरुण शेफ हीर याची कथा आहे, जो आपली ही महत्वाकांक्षा आणि इच्छा पूर्ण करण्यासाठी भारतीय पदार्थांना प्रमोट करण्याच्या हेतून युनायटेड किंगडम (यूके) ला जातो. तिथे हीर नावाची तरुणी देखील आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी यूके ला जाते. परंतु तिथे त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. या सिनेमाच्या कथेमध्ये कॉमेडी आणि नातेसंबंध पहायला मिळतील.

### अंदाज २




२००३ मध्ये अक्षय कुमार, प्रियांका चोप्रा आणि लारा दत्ता यांचा अंदाज हा सिनेमा प्रदर्शित झाला होता, आणि या चित्रपटाचे दिग्दर्शन व निर्मिती सुनील दर्शन यांनी केली होती. आता २२ वर्षांनी याच सिनेमाचा सिक्वेल, सुनील दर्शन निर्मित व दिग्दर्शित अंदाज २, आज चित्रपटगृहामध्ये प्रदर्शित होत आहे. या सिनेमामध्ये आयुष कुमार, अकाइशा आणि नताशा फर्नांडीज यांच्या मुख्य भूमिका आहेत, तर परमार्थ सिंग, श्रीकांत मस्की, संजय मेहंदीरत्ता, नीतू पांडे, पूजा कामेश्वर शर्मा, डॉली बिंद्रा, जीतू वर्मा, भरत भाटिया आदि सहकलाकार आहेत.

**कथानक**

अंदाज २ मध्ये एका प्रतिभाशाली संगीतकार आरवची कथा पाहायला मिळते. दोन महिलांचे त्याच्या आयुष्यात आगमन होते आणि त्याच्या जीवनाला कलाटणी मिळते. या प्रेमत्रिकोणात तो गुंततो. जसजसे तो आपल्या संगीताविषयीच्या प्रेमाला महत्त्व देऊ लागतो, तसतसे नात्यांमध्ये त्याचा संघर्ष वाढत जातो. या कथेमध्ये प्रेम, मैत्री, त्याग आणि स्वत:चा शोध अशा अनेक गोष्टी पाहायला मिळतील.

## ओटीटीवर काय पहाल ?

### सलाहकार




एका सत्य घटनेवर आधारित स्पाय थ्रिलर वेब सीरीज सलाहकार आज जिओ हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होत आहे.

**कथानक**

या सीरिजमध्ये १९७८ आणि २०२५ हे दोन कालप्रवाह आहेत, आणि त्यामध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अधीर, ज्यांनी शीतयुद्धाच्या वेळी पाकिस्तानच्या अण्वस्त्रे बनवण्याची महत्वाकांक्षा अयशस्वी करण्यामागे एक गुप्तहेर म्हणून महत्वाची भूमिका निभावलेली होती, त्यांची व्यक्तिरेखा पहायला मिळेल. आता २०२५ मध्ये ते भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सलाहकार म्हणून कार्यरत असून देशाला अनेक नवनव्या धोक्यांपासून सावध राहून त्यांचा सामना करायचा आहे. या सीरिजमध्ये मौनी रॉय, मुकेश ऋषि, नीन कस्तूरिया, अश्वथ भट्ट आदि कलाकार आहेत.

### ग्यारह ग्यारह





झी ५ (ZEE 5) उद्या ९ ऑगस्ट रोजी ग्यारह ग्यारह ही सीरिज प्रदर्शित होत असून ती कोरियन नाटक सिग्नल चे हिंदी रुपांतर आहे. या सीरिजची निर्मिती धर्मा प्रोडक्शन आणि सिख्या एंटरटेनमेंट यांनी केली असून दिग्दर्शन उमेश बिष्ट यांनी केले आहे. वेगवेगळ्या दोन पोलीस अधिकार्यांची कथा आहे, जे रात्री एका जुन्या वॉकी-टॉकीद्वारे ११ वाजून ११ मिनिटांनी एकमेकांशी संभाषण करतात आणि एका जुन्या गुन्ह्याचा छडा लावायचा प्रयत्न करतात. राघव जुयाल, कृतिका कामरा आणि धैर्य करवा या कलाकारांनी या सीरिजमध्ये काम केले आहे.

### 'मायासभा'




मूळ तेलुगू भाषेमध्ये बनलेली ही राजकीय नाट्यावर आधारित सीरिज काल ७ ऑगस्ट रोजी सोनी लिववर प्रदर्शित झाली असून हिंदीसह विविध भाषांमध्ये पहायला मिळणार आहे. दोन आदर्शवादी महाविद्यालयीन मित्रांचे कथानक या सीरिजमध्ये बघायला मिळते. हे दोघेजण राजकीय स्वरूप बदलण्याचे स्वप्न बघत असतात. परंतु राजकारणातील ज्येष्ठ व मुरलेले नेते असे काही राजकारण खेळतात की, या दोन मित्रांची मैत्री सत्ता संघर्ष, गुप्त तडजोडी, स्पर्धेमध्ये बदलते. या सीरिजमध्ये दिव्या दत्ता, साई कुमार, नासर, रवींद्र विजय, श्रीकांत अयंगर, शत्रु आणि तान्या रविचंद्रन इत्यादी कलाकार आहेत.

### 'अरबिया कदली'




'अरबिया कदली' ही एक तेलुगू वेब सीरिज आहे, जी आज प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होत आहे आणि ती विविध भाषांमध्ये पाहायला मिळेल. एका समुद्र किनाऱ्यावरील दोन खेडी आणि त्यातील गावकऱ्यांची कथा या सीरिजमध्ये दाखवली आहे. ही दोन्ही गावे मच्छिमारांची आहेत, त्यामुळे त्यांच्यामध्ये सतत स्पर्धा व संघर्ष सुरू असतो. या सीरिजमध्ये सत्य देव आणि आनंदी यांच्या मुख्य भूमिका असून नासर, रघु बाबू, दलीप ताहिल, पूनम बाजवा आणि हर्ष रोशन हे कलाकार देखील आहेत.

### मामन



आज झी ५ (ZEE5) या ओटीटी प्लॅटफॉर्मवर हा तमिळ ड्रामा चित्रपट येत आहे. मेमध्ये हा सिनेमा चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला होता. त्रिचीमध्ये राहणाऱ्या काका व त्याच्या पूतण्याची कथा आहे. मामनला त्याची बहीण गिरिजाचा मुलगा लड्डूवर खूप प्रेम आहे. कथेला कलाटणी मिळते, जेव्हा लड्डूचे लग्न एक डॉक्टर मुलगी रेखाशी होते आणि मग घरामध्ये तणाव आणि कौटुंबिक संघर्ष निर्माण होतो.

### वेडनसडे २





हॉलीवूडच्या लोकप्रिय फँटेसी थ्रिलर सीरिज वेडनसडेचा दुसरा सीझन ६ ऑगस्ट रोजी ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला आहे. यावेळी वेडनसडे एडम्सला नेवरमोर अकॅडमीमध्ये महालामधील सावलीत लपलेल्या एका नव्या अलौकिक रहस्याचा सामना करावा लागतो.

### द पिकअप




या आठवड्यात सहा ऑगस्ट रोजी 'द पिकअप' हा मनोरंजक चित्रपट त्याच्या भेटीला आला आहे. प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित झालेल्या या सिनेमामध्ये एक कॅश व्हॅनचा ड्रायव्हर आणि त्याचा सहकारी एका भयानक दरोड्यात फसले जातात. या सिनेमामध्ये ईवा लोंगोरिया, एंड्र्यू डाइस क्ले, मार्शॉन लिंच, रोमन रेन्स, जॅक केसी आणि इस्माइल क्रूझ कॉर्डोव्हा आदि कलाकार आहेत.

### 'लव्ह हर्ट्स'




हा ॲक्शन कॉमेडी चित्रपट काल ७ ऑगस्ट रोजी जिओहॉटस्टारवर प्रदर्शित झाला आहे. यामध्ये एका रिअल इस्टेट एजंटची कथा आहे. त्याच्या शांतीपूर्ण जीवनामध्ये अचानक भूतकाळाशी संबंधित एक लाल पत्र त्याला मिळते. के हुवी क्वान, एरियाना डिबोस आदि कलाकार यामध्ये आहेत.

### मिकी १७




हा विज्ञान कथा आधारित ब्लॅक कॉमेडी चित्रपट काल ओटीटी प्लॅटफॉर्म जिओहॉटस्टारवर प्रदर्शित झाला आहे. रॉबर्ट पॅटिन्सन, मार्क रफालो हे कलाकार यामध्ये आहेत.



## 'वो' मिळाली ....

अभिनेता आयुष्मान खुरानाचे चाहते त्याच्या नव्या चित्रपटाची वाट बघत आहेत, कारण आयुष्यमानचा आगामी सिनेमा 'पती पत्नी और वो २' ची चर्चा बऱ्याच काळापासून सुरु आहे, खासकरून चित्रपटातील कलाकारांच्या निवडीबाबत. २०१९ मध्ये बनलेल्या कार्तिक आर्यन, भूमी पेडणेकर आणि अनन्या पांडे यांच्या 'पती पत्नी और वो' चा हा सिक्वेल आहे. सिक्वेलसाठी पहिल्या भागाचे कलाकार न घेता आयुष्मान खुराना, वामिका गब्बी आणि सारा अली खान या कलाकारांची निवड करण्यात आली आहे. पण आता या सिक्वेलची एक बातमी समोर आली आहे की, 'पती पत्नी और वो' च्या सिक्वेलसाठी 'वो' मिळाली आहे. या चित्रपटामध्ये आता अभिनेत्री रकुल प्रीत सिंगची एन्ट्री झाली आहे. चित्रपटात रकुल आल्यामुळे या कॉमेडी चित्रपटात आता तीन प्रेमकथा पहायला मिळणार असे दिसते. अर्थात याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा निर्मात्याकडून करण्यात आलेली नाही. यापूर्वी आयुष्यमान खुराना व रकुल प्रीत सिंगने २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'डॉक्टर जी' मध्ये एकत्र काम केले होते. लवकरच या चित्रपटाचे शूटिंग सुरु होणार असून पुढील वर्षाच्या शेवटच्या सहा महिन्यात हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

## माझा अपमान करण्यात आला...



खल्लास गर्ल ईशा कोप्पीकरने आपल्या चित्रपटाची सुरुवात दाक्षिणात्य चित्रपटांपासून केली होती. त्यानंतर तिने 'डॉन', 'सलाम-ए-इश्क: अ ट्रिब्यूट टू लव्ह' आणि 'मैंने प्यार क्यों किया' या सारख्या हिंदी सिनेमामध्ये काम केले. नुकत्याच एका मुलाखतीमध्ये दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीमध्ये केलेल्या वाईट वर्तनाविषयी ईशाने मनमोकळेपणाने सांगितले. ईशा म्हणाली, 'हे खरे आहे की, मी साउथ चित्रपटांद्वारे माझी अभिनय कारकिर्द सुरु केली होती. मी सिनेमाच्या सेटवर चांगले नृत्य करत असे. हे तर सर्वांना माहित आहे की, दाक्षिणात्य चित्रपटांमधील नृत्याच्या स्टेप्स सोप्या नसतात. पण माझ्या पहिल्या चित्रपटाच्या नृत्य दिग्दर्शकाने मला सर्वांसमोर सांगितले की, 'या बॉलीवूडच्या मुली इथे का येतात? यांना कशाला घेतात, कोण जाणे? यांना काहीही येत नाही.' अशा पद्धतीने सेटवर माझा अपमान करण्यात आला होता. मला या गोष्टीचे खूप वाईट वाटले. मी माझ्या मेकअप रुममध्ये जाऊन खूप रडले होते. मात्र हा अपमान मी आव्हान म्हणून स्वीकारला आणि त्या नृत्य दिग्दर्शकाला सांगितले की, 'या पुढे मी कुठला दाक्षिणात्य चित्रपट स्वीकारला तर नृत्य शिकून येईन. पुन्हा माझ्याविषयी असे उद्गार कुणाला काढू देणार नाही.' ईशाने हे देखील सांगितले की, मुंबईला आल्यावर तिने नृत्य दिग्दर्शिका सरोज खान यांच्याकडून नृत्याचे शिक्षण घेतले. २००२ मध्ये कंपनी या चित्रपटातील खल्लास या गाण्याने ईशा ईशा कोप्पीकरला रातोरात प्रसिद्धी मिळवून दिली.

## मुलाच्या गाण्यावर पप्पांचा धमाल डान्स



सुपरस्टार ऋतिक रोशन आणि ज्युनिअर एनटीबार अभिनित 'वॉर - २' या वर्षातील सर्वात बहुचर्चित चित्रपट मानला जातो. २०१९ मध्ये सुपरहिट झालेल्या 'वॉर' चा हा सिक्वेल अयान मुखर्जीने दिग्दर्शित केला आहे. सहा दिवसांपूर्वीच या चित्रपटातील पहिले रोमँटिक गाणे 'आवन - जावन' प्रदर्शित करण्यात आले. आता या गाण्यावर युजर्स रील बनवू लागले आहेत. परंतु ज्येष्ठ अभिनेता आणि दिग्दर्शक राकेश रोशन यांचे एक रील खूप व्हायरल होत आहे. या रीलमध्ये ७५ वर्षीय राकेश रोशन आपल्या साथीदारांसह 'आवन - जावन' या गाण्यावर त्याच डान्स स्टेप्स करत आहेत, ज्या चित्रपटामध्ये ऋतिक आणि कियारा अडवाणीने केल्या आहेत. त्यांचे हे नृत्य पाहून लोक आश्चर्यचकित होत आहेत. कारण काही दिवसांपूर्वीच राकेश रोशन यांच्यावर सर्जरी करण्यात आली आहे. हा व्हिडिओ आपल्या इंस्टाग्रामवर शेअर करत ऋतिकने लिहिले आहे की, 'अविश्वसनीय... हाहाहा, बेस्ट एव्हर. पापा, आपने किल कर दिया, क्या ग्रेस है.' राकेश रोशन यांचे चाहते देखील त्यांच्या या नृत्याची मनमुराद प्रशंसा करत आहेत. एका युजरने लिहिले आहे की, खरं तर हा ट्रेंड तुम्हीच जिंकला आहे. अभिनेत्री सिमी गरेवालनी लिहिले आहे, 'गुड्डू, काय ग्रेस आहे, काय ताल आहे. तू तर ऋतिक रोशनचा बाप निघालास.' अन्य एका युजरने लिहिले आहे की, 'बाप तर बापच असतो. राकेश अंकल यांचा स्वॅग काही वेगळाच आहे.'

## तमन्नाची प्रेमप्रकरणे




दाक्षिणात्य आणि हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये काम करणारी अभिनेत्री तमन्ना भाटिया 'स्त्री २ मधील तिच्यावर चित्रित 'झालेल्या 'आज की रात' या गाण्यामुळे प्रेक्षकांचे लक्ष केंद्रित करण्यात यशस्वी झाली आहे. कारण त्यापूर्वी तिने केलेल्या हिंदी चित्रपटांमधील तिच्या भूमिका प्रेक्षकांच्या फारशा लक्षात देखील नव्हत्या आणि त्यातील अनेक चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारसे चालले नव्हते. तर या तमन्ना भाटियाचे नाव आत्तापर्यंत अनेक सेलिब्रिटींशी जोडले गेले आहे आणि त्यामुळे तिला खूप प्रसिद्धी मिळाली आहे. कोण आहेत ते सेलिब्रिटी ? सर्वप्रथम तमन्नाचे नाव भारतीय स्टार क्रिकेटर विराट कोहलीशी जोडले गेले होते. एकेकाळी तमन्ना भाटियाने विराट कोहलीसह एक जाहिरात चित्रित केली होती आणि त्यावेळी ते एकमेकांना डेट करत असल्याची चर्चा होती. अर्थात, तमन्ना आता सांगते की, त्या जाहिरातीनंतर ती कधीही विराटला भेटली नाही. त्यानंतर तमन्नाचे नाव पाकिस्तानी क्रिकेटर अब्दुल रज्जाकसह जोडले गेले होते आणि दोघांच्या लग्नाची अफवा देखील पसरली होती. या बातमीत तथ्य नसल्याचा खुलासा करत नंतर तमन्नाने सांगितले की, एका ज्वेलरी समारंभामध्ये आम्ही दोघे एकत्र थांबले होते आणि त्यामुळेच आम्ही गुपचूप लग्न केल्याच्या अफवा पसरल्या होत्या. त्यानंतर तिचे नाव अभिनेता विजय वर्माशी जोडले गेले. २०२३ मध्ये नेटफ्लिक्सच्या 'लस्ट स्टोरीज २' च्या सेटवर दोघांची भेट झाली होती आणि त्यानंतर विजयशी तिचे प्रेमसंबंध सुरु झाले होते. काहीच दिवसांपूर्वी दोघे वेगळे झाले असले तरी त्याचे कारण कळलेले नाही. आता तमन्नाचे नाव कुणासोबत जोडले जाते ते पहायचे आहे.

## अनुष्काच्या सिनेमाचे १०० कोटींचे नुकसान



अभिनेत्री अनुष्का शर्मा जवळपास गेली सहा वर्ष चित्रपटांपासून दूर आहे. विराट कोहलीशी विवाह केल्यानंतर तिने चित्रपटामध्ये काम करणे बंद केले आणि नंतरच्या काळात आई बनल्यावर ती पूर्णत: चित्रपटसृष्टीपासून लांब गेली आहे. अर्थात, त्यामुळे तिच्या लोकप्रियतेवर कुठलाही विपरीत परिणाम झालेला नाही. कुठल्या ना कुठल्या कारणाने ती चर्चेत असते. पण इथे तिच्या एका अशा चित्रपटाची माहिती वाचकांसोबत शेअर करत आहोत, ज्यामुळे निर्मात्याला १०० कोटींचा फटका बसला होता. दहा वर्षांपूर्वी, २०१५ मध्ये प्रदर्शित झालेल्या अनुष्का शर्मा आणि सुपरस्टार रणबीर कपूर अभिनित व अनुराग कश्यप दिग्दर्शित 'बॉम्बे वेलवेट' या सिनेमात करण जौहर, के के मेनन, सत्यदीप मिश्रा आणि मनीष चौधरी यांनी काम केले होते. बॉम्बे वेलवेट चे निर्माता होते अनुराग कश्यप आणि विकास बहल. या चित्रपटाचे एकूण बजेट होते सुमारे ११८ कोटी रुपये. परंतु हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर २५ कोटींची कमाई देखील करू शकला नव्हता. चित्रपटाच्या पहिल्याच दिवशी सिनेमाची तिकिटे विकली गेली नव्हती आणि संपूर्ण भारतात या चित्रपटाने पाच कोटींची बोहनी केली होती. दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी तर या चित्रपटाची दुर्दशा सुरू झाली होती. अनुष्का आता पुन्हा सिनेमामध्ये काम करेल की नाही, याविषयी सांगता येत नाही, पण नायिका म्हणून आपल्या शेवटच्या चित्रपटाची अशी दुर्दशा व्हावी, ही अनुष्कासाठी दुःखद बाब आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१३३६



**आडवे शब्द –** २. चाकू, मदिरा ४. वचक ६. जीवश्चकंठश्च मित्र ८. सोन्याचांदीच्या दुकानांची पेठ ११. भाट, खुशामत करणारा १४. स्त्री १६. दोन नद्या एकत्र येतात ते स्थान १७. सत्तावीसपैकी दुसरे नक्षत्र १८. आडाखा २०. मुलखावेगळा २२. दासी २४. वरदान देणारी देवता २५. वस्तू, जिन्नस २६. समान, सारखा २७. जुगार २८. प्रारब्धदेवता ३०. श्रीराम ३२. बारीक तुकडा ३३. अहंकार ३४. कबूल ३५. भीमाचे शस्त्र ३६. विहीर ३७. कोल्हापुरी दागिना ३८. चंगळ, स्वास्थ्य ३९. संसदसदस्य ४२. नगरपालिकेचे सदस्य ४५. एक लवचिक पदार्थ ४६. ऐश्वर्य ४८. द्रोह, गद्दारी ४९. शिकारीसाठी हेरलेला प्राणी ५०. मृग ५१. मंदिर ५४. मध ५७. चिन्ह, गमक ५८. मुलाची बायको ५९. संत ज्ञानेश्वरांना भेटायला वाघावर बसून गेलेला योगी ६१. साहस, हिंमत ६४. धीमा, संथ ६५. छळ ६६. ऐतखाऊ ६७. वास्तव्य ६८. तळघरात धान्य साठवण्यासाठी केलेली जागा ६९. साह्य, हातभार ७२. कबर ७३. भिस्त, हवाला ७४. कबूतर ७५. किनारा, काठ ७६. मैत्रीण ७७. देणारा, दानी ७८. व्रत, नेम ८१. नेहमी ८२. आय, गोळा झालेले ८३. अडकवणे, गोवणे ८४. कोमल ८६. मृत्यूवर विजय ८८. गरीब ८९. खूप खाणारा ९१. कपाळाची जखम ९२. खोटे विधान ९४. संगीतातला दुसरा स्वर ९६. घोड्याच्या पायाला ठोकलेला पत्रा ९८. चबढब १००. ज्वारी, मका वगैरे भाजून तयार होणारा पदार्थ १०१. भेग १०३. मनमोहक १०४. अगदी कमी अंश १०५. शीर, नाडी १०७. नवलाई १०८. शेकोटी १०९. भरडलेले द्विदल धान्य ११०. खोल बुडी मारणे

**उभे शब्द –** १. समुद्रमंथनातून आलेला 'मणी' २. सुंकले, एकच मोती असलेली नथ ३. खरबरीत ५. झुकलेला ६. इमारतीत वर-खाली पायी जाण्याचा मार्ग ७. फसवणारा, लुच्चा ८. सर्व, अख्खा ९. राघव १०. परीक्षा १२. तुसडा, चिडखोर १३. दयामाया नसलेला १५. आपलेपणा, जिव्हाळा १६. युद्ध, लढाई १९. गुणांची कदर करणारा २०. आप, पाणी २१. गुरांच्या नाकात घातलेली दोरी २२. कलंक, डाग २३. कांद्याचे बी २४. कुंपण २५. मृत्तिका २७. सगळे २८. मैत्रीपूर्ण संबंध २९. व्यापाऱ्यांचे आपसात दिलेले वचन ३१. पळून गेलेला ३२. टणक, शिस्तप्रिय ३३. गर्दी, गोंगाट ३४. भयभीत, व्याकूळ ३६. अवसान, आवेश ३७. बैलगाडी ४०. प्रसंगावधान ४१. दात ४३. आगाशी ४४. नोकर ४७. मोजदाद ५०. मारुती ५२. काया, देह ५३. दांभिकता, लबाडी ५४. धन, वित्त ५५. सुतारकामाचे एक आयुध ५६. पोह्यांचा प्रकार ५९. रजत, रौप्य ६०. हिमालयाच्या आसपास आढळणारा रामायणकालीन वृक्ष ६२. नवऱ्याची दुसरी बायको ६३. मजेशीर ६५. सरकारी खजिना ६६. इंद्राचा हत्ती ७०. प्रत्येक ७१. बढाई ७६. कार्यक्रम, सोहळा ७९. श्यामवर्णी ८१. ताकीद, जाणीव ८३. मवाली ८४. अमान्य ८५. कहाणी ८७. ताबडतोब ९०. मसाल्याच्या पदार्थपैकी एक ९१. झाडाचा बुंधा ९३. पळसाचे झाड ९५. कार्तिकेय ९७. आधण ९८. हडकुळा ९९. डबके, झिरा १०२. खूप, जास्त १०५. नवा १०६. आप्त •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३३५चे उत्तर**

**आडवे शब्द** : शब्दकोडे क्रमांक १३३५ चे उत्तर

आडवे शब्द : २. चपला ४. चुटपुट ८. घबाड १०. आलूटिक्की १२. वर्तणूक १३. पाणिग्रहण १५. गवा १७. पुण्य १८. साल १९. क्रय २०. गमक २१. काटा २३. ऐरावत २४. दैव २५. उमग २६. तगडा २७. टपरी २८. सत्य २९. घोडी ३०. यदा ३२. काणा ३३. दल ३४. तोंड ३६. वाद ३९. चपराशी ४१. अलगद ४३. नरमाई ४६. यामिनी ४७. सफरचंद ४८. शरावती ४९. रवाळ ५१. चळवळ ५२. बिलवर ५६. बेत ५७. पथक ५९. अवधी ६०. शालीन ६३. मजा ६४. कान ६५. लडिवाळ ६७. मोल ६८. कटाक्ष ७०. रजत ७२. चमकी ७३. नात ७५. कसब ७७. वणवा ७९. वडील ८१. अंथरुण ८२. भार ८३. हरळी ८४. तयारी ८६. किताब ८८. चेतक ९०. कन्या ९२. आरास ९४. जुना ९५. अश्राप ९७. यास्तव ९८. डाका १००. राघव १०२. बद्ध १०३. हतबल १०४. युवक १०६. पाव १०८. मस्तक १०९. यथाशक्ती ११०. मीठ १११. पाहुणेर

**उभे शब्द** : १. चालू २. चक्की ३. लावण्यवती ४. चुणूक ५. टक ६. टपाल ७. अग्रक्रम ८. घण ९. डगमगणे १०. आटोकाट ११. टिळा १४. हयगय १७. वाकडा १७. पुरा १८. साव २०. गत २२. टापटीप २४. दैत्य २५. उडी २८. सलग २९. घोडनवरा ३१. दावा ३२. काशीफळ ३३. दलदल ३५. भामा ३७. दयाळ ३८. मनीषा ३९. चणचण ४०. रासवट ४१. अचंबित ४२. दशरथ ४४. रती ४५. ईर ५०. वाफ ५३. वपन ५४. रवळनाथ ५५. भेली ५६. बेजार ५८. कलमकारी ५९. अवा ६०. शालक ६१. नशीब ६२. चटावरचे श्राद्ध ६४. कातडी ६६. डिकी ६९. क्षण ७१. जवळीक ७४. तरुणी ७६. सविता ७८. वाहक ८०. लत ८१. अंगारा ८५. यादव ८६. किनारा ८७. बल्लव ८९. तप ९१. न्यायालय ९२. आरव ९३. सडा ९५. अबला ९६. घातक ९९. कापा १०१. घराणे १०३. हस्त १०४. युक्ती १०५. कमी १०७. वपा

# युएईच्या विमानावर हवाई हल्ला! ४० प्रवाशांचा मृत्यू

■ खार्टुम

**सुदानच्या** हवाई दलाने आज संयुक्त अरब अमिरातीच्या (यूएई) विमानावर हल्ला केला. हे विमान दार्फुर येथील न्याला विमानातळावर उतरले होते. या हल्ल्यात विमान पूर्णपणे नष्ट झाले असून यातील ४० प्रवाशांचा मृत्यू झाला.

या विमानात कोलंबियाचे भाडोत्री सैनिक होते. या विमानात अनेक परदेशी सैनिक आणि आरएसएफसाठीची हत्यारे आणि उपकरणे होती, असा दावा सुदानमधील सरकारी माध्यमांनी केला आहे. कोलंबियाचे राष्ट्रपती गुस्ताव पेट्रो यांनी सांगितले की, या हल्ल्यात किती कोलंबियन मारले गेले? याची माहिती घेण्याचा प्रयत्न कोलंबियाचे सरकार करत आहे. त्यांचे मृतदेह परत आणता येतील का? याची तपासणी सुरु आहे. भाडोत्री सैनिकांच्या वापरावर बंदी घालावी.

# राज ठाकरेंबाबत 'इंडिया'च्या कोणत्याही अटीशर्ती नाहीत

»पान १ वरून

सुरू आहे. मतदारांना स्वतःची ओळख पटवावी लागत आहे. यावरून देशात अघोषित एनआरसी लागू झाला आहे का? असा प्रश्न निर्माण होत आहे. या मुद्यावरून देशभरात विरोध झाला होता. त्यामुळे अघोषित एनआरसी लागू केला आहे का, याचे उत्तर निवडणूक आयोगाने द्यावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ईव्हीएमला आमचा आक्षेप आहे. त्यातच त्यांनी व्हीव्हीपॅट काढून टाकले आहे. म्हणजे निवडणुकीतील पारदर्शकताच यांनी घालवून टाकली आहे. असे करायचे असेल तर निवडणुका कशाला घेत आहेत. आपले मत नेमके कोणाला गेले, हे मतदाराला समजले पाहिजे. मात्र, ईव्हीएममध्ये ही पारदर्शकता नाही. आता व्हीव्हीपॅट काढले तर मत कोणाला जाते, हे मतदाराला समजणारच नाही. भाजपा आणि केंद्र सरकारवर टीका करताना ते म्हणाले की, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांना तडकाफडकी का काढण्यात आले? आता ते कुठे आहेत?

उद्धव ठाकरे यांनी आज संसद भवनातील पक्षाच्या कार्यालयालाही भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत पत्नी रश्मी ठाकरे आणि आमदार आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, अरविंद सावंत आणि इतर खासदारही उपस्थित होते.

# तुळजाभवानीच्या गाभाऱ्यातील दर्शन २० ऑगस्टपर्यंत बंद



■ तुळजापूर

**महाराष्ट्राची** कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या मुख्य गाभाऱ्यातील दर्शन जीर्णोद्धाराच्या कामामुळे शुक्रवार १ ऑगस्टपासून ते रविवार १० ऑगस्ट या कालावधीत भाविकांसाठी बंद राहणार होते. पण कालावधीत काम पूर्ण न झाल्याने आता बुधवार २० ऑगस्टपर्यंत मुख्य गाभाऱ्यातील दर्शन बंद राहणार आहे. मंदिर प्रशासनाने सांगितले की, देवीच्या गाभाऱ्यातील जीर्णोद्धाराचे काम पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात येत आहे. हे काम अद्याप अपूर्ण असल्यामुळे दर्शन बंदीचा कालावधी आणखी दहा दिवसांनी वाढवण्यात आला आहे. पण भाविकांना देवीचे मुखदर्शन घेता येणार आहे. तसेच सिंहासन पूजा, अभिषेक आणि इतर धार्मिक विधी नियमित सुरू राहणार आहेत.

## वादग्रस्त वक्तव्य टाळा! शिंदेंच्या मंत्र्यांना सूचना

**मुंबई-** मंत्र्यांनी वादग्रस्त वक्तव्य टाळा, त्यामुळे पक्षाचे नाव खराब होते, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या मंत्र्यांना तंबी दिली. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार आहेत. या पार्श्वभूमीवर शिंदे यांनी आपल्या आमदार व मंत्र्यांना सूचना दिल्या आहेत. ते म्हणाले की, वादग्रस्त वक्तव्यांमुळे पक्षाची प्रतिमा मलीन होते. माध्यमांमध्ये किंवा जनतेत दिलेल्या अशा विधानांमुळे मंत्र्यांचे आणि पक्षाचे नुकसान होते. विरोधकांच्या प्रत्येक टीकेला तोंडाने उत्तर देण्याची आवश्यकता नाही. कामातूनच त्यांना उत्तर द्या. तळागाळात जाऊन काम करा, मंत्र्यांना जबाबदारी दिलेल्या जिल्ह्यातून निवडणुकांमध्ये अपेक्षित निकाल दिसला पाहिजे.

## रायगडावरील नवीन संरक्षक भिंत कोसळली

**रायगड –** जागतिक वारसा दर्जा प्राप्त रायगड किल्ल्यावरील पायरी मार्गावरील नव्याने बांधलेली संरक्षण भिंत आज कोसळली . या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, कामाचा दर्जा आणि देखभालीविषयी गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. महादरवाजाच्या काही अंतरावर असलेली ही भिंत अलीकडेच नव्याने बांधण्यात आली होती. काहीच दिवसांत ती कोसळल्याने प्रशासनाच्या निष्काळजीपणावर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.


**INDUSIND BANK LIMITED**

**Regd. Office :** 2401, General Thimmayya Road, Cantonment, Pune-411 001.
**Secretarial & Investor Services :** 701 Solitaire Corportate Park,
167 Guru Hargovindji Marg, Andheri (E), Mumbal-400 093.

**NOTICE FOR LOSS OF SHARE CERTIFICATE(S)**

Notice is hereby given that the certificate(s) of Indusind Bank Ltd. for the under mentioned securities are stated to have been lost or misplaced and the registered holders have applied to the Bank for issue of duplicate Share Certificate(s). Any person who has / have a claim(s) in respect of the said security(ies) should lodge such claim(s) in writing with **R & T Agents of Bank viz. MUFG Intime India Private Limited (Formerly known as Link Intime India Private Limited) C-101, 247 Park, LBS Marg, Vikhroli (West), Mumbai-400 083** within 7 **(Seven)** days from this date else the company will proceed to issue duplicate certificate without further intimation.

| SR. NO. | NAME OF THE SHAREHOLDER | REGISTERED FOLIO NO. | CERTIFICATE NO. | DISTINCTIVE NOS. | | NO. OF SHARES |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Ramesh A V | 00708162 | 637911 | 222910497 | 222911621 | 1125 |

**(AUTHORISED SIGNATORY)**
sd/-
**Place :**Mumbai
**Date :** 08.08.2025
INDUSIND BANK LIMITED

Rameshwar Media


## गणेशोत्सवापूर्वी कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन द्या

**जयंत पाटलांची मागणी**

**मुंबई-** गणेशोत्सवापूर्वी कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन द्यावे अशी मागणी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे. या पत्रामध्ये जयंत पाटील यांनी म्हटले की, काही दिवसांतच गणरायाचे आगमन होणार आहे. या सणासुदीच्या काळात नागरिकांची आर्थिक गरज लक्षात घेता शासनाने शासकीय सेवकांचे व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन गणेश चतुर्थीपूर्वी द्यावे . त्याचसोबत, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, संजय गांधी निराधार योजना आणि इतर कल्याणकारी योजनांचे प्रलंबित तसेच चालू हप्तेही सणापूर्वी वितरित करावेत, जेणेकरून त्यांना सण आनंदाने साजरा करता येईल.

## पृथ्वीराज चव्हाणांना १० कोटींची नोटीस



■ मुंबई

**मालेगाव** बॉम्बस्फोट प्रकरणात सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता झाल्यानंतर काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी भगवा दहशतवाद नाही, तर सनातनी दहशतवाद म्हणा, असे वकत्व्य केले होते. त्यानंतर स्पष्टीकरण देताना त्यांनी धर्माला नव्हे, तर सनातन संस्था या संस्थेला दहशतवादी संघटना म्हटले असल्याचे सांगितले. मात्र या वक्तव्यामुळे संतप्त झालेल्या सनातन संस्थेचे विश्वस्त वीरेंद्र मराठे यांनी याबद्दल चव्हाण यांना १० कोटी रुपयांची मानहानीची नोटीस पाठवली आहे.

या नोटिशीद्वारे चव्हाण यांनी १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात बिनशर्त माफी मागावी, ती माफी मूळ वादग्रस्त मुलाखतीइतक्याच ठळकपणे प्रसिद्ध करावी. यापुढे भविष्यात कोणतीही बदनामीकारक विधाने करू नयेत, तसेच १० हजार रुपये कायदेशीर खर्च भरपाई म्हणून भरावेत अशा मागण्या केल्या आहेत. याबाबत सनातन संस्थेचे प्रवक्ते अभय वर्तक यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, चव्हाण यांनी माफी न मागल्यास कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल.


**INDUSIND BANK LIMITED**

**Regd. Office :** 2401, General Thimmayya Road, Cantonment, Pune-411 001.
**Secretarial & Investor Services :** 701 Solitaire Corportate Park,
167 Guru Hargovindji Marg, Andheri (E), Mumbal-400 093.

**NOTICE FOR LOSS OF SHARE CERTIFICATE(S)**

Notice is hereby given that the certificate(s) of Indusind Bank Ltd. for the under mentioned securities are stated to have been lost or misplaced and the registered holders have applied to the Bank for issue of duplicate Share Certificate(s). Any person who has / have a claim(s) in respect of the said security(ies) should lodge such claim(s) in writing with **R & T Agents of Bank viz. MUFG Intime India Private Limited (Formerly known as Link Intime India Private Limited) C-101, 247 Park, LBS Marg, Vikhroli (West), Mumbai-400 083** within 7 **(Seven)** days from this date else the company will proceed to issue duplicate certificate without further intimation.

| SR. NO. | NAME OF THE SHAREHOLDER | REGISTERED FOLIO NO. | CERTIFICATE NO. | DISTINCTIVE NOS. | | NO. OF SHARES |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Bharathi M S | 00715069 | 638988 | 224074217 | 224075341 | 1125 |

**(AUTHORISED SIGNATORY)**
sd/-
**Place :** Mumbai
**Date :** 08.08.2025
**INDUSIND BANK LIMITED**

**Rameshwar Media**


# कबुतरखान्यांवर बंदीच

»पान १ वरून- आमच्या निर्णयाचा अवमान कुणीही करू नये. यावर आक्षेप असेल तर तुम्ही वरच्या न्यायालयात दाद मागू शकता. याशिवाय कबुतरखान्यांसंदर्भात निर्णय घेण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश असलेली समिती स्थापन करावी. या समितीचा अहवाल सगळ्यांसाठी बंधनकारक असेल. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे शिवसेना शिंदे गटाच्या आमदार मनीषा कायंदे यांनी स्वागत करत म्हटले की, कबुतरांच्या उपद्रवाला आळा घातला पाहिजे. माणसांच्या आरोग्यापेक्षा इतर कुठलाही विषय महत्त्वाचा नसल्याचे न्यायालयाने पुन्हा अधोरेखीत केले आहे.

## सीआरपीएफ बस दरीत कोसळून ३ जवान ठार

»पान १ वरून- झालेल्या अपघातात सीआरपीएफच्या जवानांचा झालेला दुर्दैवी मृत्यू अतिशय दुःखद आहे. त्यांच्या राष्ट्रसेवेचे योगदान आम्ही कधीही विसरणार नाही. माझ्या संवेदना शोकाकुल कुटुंबीयांबरोबर आहेत. जखमी जवानांच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना सर्वोत्तम उपचार व मदतीचे निर्देश दिले आहेत.

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री व उधमपूरचे खासदार जितेंद्र सिंह यांनी एक्सवर लिहिले की, या घटनेबाबत दुःख व्यक्त करत उधमपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीवर वैयक्तिक लक्ष ठेवत असल्याचे सांगितले. बचावकार्य तत्काळ सुरू करण्यात आले आहे. सर्वतोपरी मदत केली जात आहे.

## मतांची चोरी! राहुल गांधींनी यावेळी पुरावेच दिले एकाचे अनेक केंद्रांत-अनेक राज्यांत मतदान

»पान १ वरून-

मतांची चोरी करण्यात आली. पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या मतदारांच्या यादीतील मतदारांचे वय ८०, ८५, ६५ असे नोंदवलेले आहे. या पत्रकार परिषदेनंतर राहुल गांधी यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या काही प्रश्नांना उत्तरेही दिली. निवडणूक आयोगाने मतदार याद्यांमध्ये केलेला घोळ तुम्ही पुराव्यानिशी उघड करत आहात तर यावर पुढे जाऊन तुम्ही काय कृती करणार आहात, असा प्रश्न विचारला असता, देशातील लोकशाहीच संपवायला निघालेल्या भाजपाला आणि त्याला या अतिशय गंभीर गुन्ह्यात मदत करणाऱ्या निवडणूक आयोगाला त्यांच्या कृत्यांची फळे एक ना एक दिवस नक्कीच भोगावी लागतील, असे उत्तर राहुल गांधी यांनी दिले.

**राहुल गांधी खोटे बोलतात फडणवीसांचा पलटवार**

राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारले असता ते म्हणाले की, राहुल गांधी धडधडीत खोटे बोलत आहेत. त्यांच्या काँग्रेस पक्षाचे अस्तित्व आता नष्ट झाल्यात जमा आहे. त्यामुळे ते वारंवार असे खोटे आरोप करत आहेत. मतदार याद्यांमध्ये कसलाही घोळ झालेला नाही. खरेतर राहुल गांधी यांच्या डोक्यातील चीप हरवली आहे. त्यांची हार्ड डिस्क करप्ट झाली आहे.

काँग्रेस पक्ष महाराष्ट्र, बिहारच नव्हे तर कुठल्याही राज्यात आता निवडून येणार नाही, हे राहुल गांधींना पक्के समजले आहे. म्हणूनच ते निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थांवर आरोप करत आहेत. जेणेकरून लोकांचा या संस्थांवरून विश्वास उडावा, देशात अराजक माजावे अशी त्यांची इच्छा आहे.

एकीकडे मतदार याद्यांमध्ये घोळ असल्याचे सांगतात आणि दुसरीकडे बिहारमध्ये निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या विशेष सखोल पुनर्परिक्षणाला विरोध करत आहेत. त्यांना जर मतदार याद्यांमध्ये सुधारणा करायची आहे, तर मग ते पुनर्परिक्षणाला विरोध का करत आहेत.

## सरनाईकांच्या 'गोविंदा'ला रॅपिडोची स्पॉन्सरशिप

»पान १ वरून

मंत्र्यांनीच अडवून त्यावर कारवाई केली. बातम्या झळकल्या, प्रसिद्धी मिळाली. पण आता त्या रॅपिडोशीच मांडवली करून त्यांच्या मुलाच्या स्पर्धेला स्पॉन्सरशिप मिळाली. हे सरकार जनतेसाठी नसून स्वतःसाठी काम करत आहे, हे यावरून स्पष्ट होते. पण मला सरकारला विचारायचे आहे की, हा मंत्रिपदाचा गैरवापर तर नाही ना?

तर काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार उपरोधिक प्रतिक्रिया देताना म्हणाले की, आधी एका खासगी ॲपवरून बाईक बुक करायची. मग गरीब बिचाऱ्या बाईकवाल्याला पकडायचे. ॲपवरून बाईक चालवणे नियमबाह्य आहे असा स्टंट करायचा, त्याचे व्हिडिओ बनवून परिवहन मंत्री किती स्मार्ट आणि अलर्ट आहेत असे दाखवायचे. आणि आणि नंतर त्या ॲपवाल्यांकडूनच इव्हेंटसाठी निधी घ्यायचा. किती छान कल्पना आहे. पैसे उभे करायचे असेल, तर मंत्र्यांना काय काय करावे लागते.


artson A TATA Enterprise

**आर्टसन लिमिटेड**
**(पूर्वीची आर्टसन इंजिनिअरिंग लिमिटेड)**
**सीआयएन : L27290MH1978PLCO20644**
**नोंदणीकृत कार्यालय:** १४ वा मजला, सिग्नस, प्लॉट नं. ७१अ, कैलाश नगर, मयूर नगर पासपोली, पवई, मुंबई ४०००८७
दूरध्वनी: ०२२-६६२५५६००; **ई-मेल:** investors@artson.net; **वेबसाईट:** www.artson.net

**४६वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम), ई-व्होटिंग आणि पुस्तक बंद करण्याची सूचना**

येथे सूचना देण्यात येते की, आर्टसन लिमिटेड (कंपनी) च्या सदस्यांची ४६वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) सोमवार, १ सप्टेंबर २०२५ रोजी दु.१५:३० वा.(भाप्रवे) नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे प्रदान केलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्स (व्हीसी) / अन्य दृकश्राव्य माध्यम (ओएव्हीएम) सुविधेद्वारे आयोजित केली जाईल, जेणेकरून एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवसायावर विचारविमर्श करता येईल.

ज्या सदस्यांचे ई-मेल आयडी शुक्रवार, १ ऑगस्ट २०२५ रोजी कंपनीकडे नोंदणीकृत होते, त्यांना गुरुवार, ७ ऑगस्ट २०२५ रोजी वित्तीय वर्ष २०२४-२५ (एजीएम दस्तावेज) च्या वार्षिक अहवालासह वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कागदपत्रांची वास्तविक प्रत केवळ विशेषतः विनंती करणाऱ्या सदस्यांनाच पाठवली जाईल.

जर त्यांनी डिमटेरियलाइज्ड स्वरूपात शेअर्स धारण केले असतील तर त्यांच्या संबंधित डिपॉझिटरीजकडे आणि वास्तविक स्वरूपात शेअर्स धारण केले असतील तर, कंपनीच्या आरटीए, मे.एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) यांना त्यांच्या rnt.helpdesk@in.mpms.mufg.com या ई-मेल पत्त्यावर वार्षिक सर्वसाधारण सभेचे दस्तऐवज प्राप्त करण्यासाठी विनंती पत्राची स्कॅन केलेली प्रत, ई-मेल पत्ता, मोबाईल नंबर आणि स्व-प्रमाणित पॅन प्रत प्रदान करावी.

वार्षिक सर्वसाधारण सभेचे दस्तऐवज कंपनीच्या www.artson.net या वेबसाइटवर, एनएसडीएल च्या www.evoting.nsdl.com या वेबसाइटवर आणि बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहेत.

सदस्य नोंदणी मंगळवार, २६ ऑगस्ट २०२५ ते सोमवार, १ सप्टेंबर २०२५ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहील. सदस्य फक्त व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात, ज्याची माहिती सभेच्या सूचनेमध्ये दिली आहे. व्हीसी/ओएव्हीएम द्वारे सभेला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची गणना गणसंख्या मोजण्यासाठी केली जाईल.

ज्या सदस्यांचे नाव सदस्यांच्या नोंदणीमध्ये किंवा ठेवीदारांनी राखलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदणीमध्ये कट-ऑफ तारखेला, म्हणजेच सोमवार, २५ ऑगस्ट २०२५ रोजी आहे, ते इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतात.

रिमोट ई-व्होटिंग शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५ रोजी स.९:०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि रविवार, ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सायं.१७:०० वा. (भाप्रवे) पर्यंत खुले राहील. एकदा मतदान झाल्यानंतर, त्यात बदल करता येणार नाहीत. याव्यतिरिक्त, कंपनी व्हीसी/ओएव्हीएम सभेदरम्यान रिमोट ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदानाची सुविधा प्रदान करेल. वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी रिमोट ई-व्होटिंग / वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान रिमोट ई-व्होटिंगची तपशीलवार प्रक्रिया वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये दिली आहे.

रिमोट ई-व्होटिंगचे निकाल आणि वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान टाकण्यात आलेल्या मतांची घोषणा वार्षिक सर्वसाधारण सभेच्या समाप्तीपासून ४८ तासांच्या आत केली जाईल.

सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स घेणारी आणि कंपनीची सदस्य बनलेली आणि कट-ऑफ तारखेला म्हणजेच सोमवार, २५ ऑगस्ट २०२५ रोजी शेअर्स धारण करणारी कोणतीही व्यक्ती, एनएसडीएलला evoting@nsdl.com वर किंवा आरटीएला rnt.helpdesk@in.mpms.mufg.com वर विनंती पाठवून लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मिळविण्याची सविस्तर प्रक्रिया एजीएमच्या सूचनेमध्ये दिली आहे. तथापि, जर सदस्य आधीच एनएसडीएलमध्ये नोंदणीकृत असेल, तर विद्यमान वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड वापरता येईल.

ई-मतदानाशी संबंधित कोणत्याही प्रश्नांच्या बाबतीत, सदस्यांनी कृपया सदस्यांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि एनएसडीएलच्या वेबसाइटच्या डाउनलोड्स विभागात उपलब्ध असलेले वापरकर्ता पुस्तिका पहावी किंवा evoting@nsdl.com वर एनएसडीएलशी संपर्क साधावा किंवा ०२२-४८८६ ७००० वर संपर्क साधावा.

**आर्टसन लिमिटेडकरिता**
सही/-
**दीपक त्रिवेवाल**
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी (एफसीएस ८९२५)

दिनांक: ८ ऑगस्ट २०२५
ठिकाण: मुंबई

नवाकाळ

• पुणे | शुक्रवार ८ ऑगस्ट, २०२५ • पान -८

## ओडिशात सर्व सरकारी इमारती भगव्या होणार

**भुवनेश्वर -** ओडिशातील भाजपा सरकारने नुकतेच नवे परिपत्रक जारी केले असून, सर्व सरकारी इमारतींसाठी भगव्या रंगछटा असलेला नवा रंग लावला जाणार आहे. या निर्णयानुसार सरकारी




इमारती फिकट भगव्या आणि गडद भगव्या रंगाची किनार अशा रंगसंगतीने रंगवणे बंधनकारक करण्यात आले आहे. भाजपा सरकारने याआधी बीजू जनता दल सरकारच्या कार्यकाळातील सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गणवेशाचा रंगही बदलला होता. आता सरकारी इमारतींचा रंगही बदलण्याचा निर्णय घेतल्याने विरोधकांनी त्यावर जोरदार टीका केली आहे.

## भीमा-कोरेगाव हिंसाचार प्रकरण आरोपीची हायकोर्टात याचिका

■ मुंबई

**वडिलांची** तब्येत बिघडली असून, त्यांना भेटण्यासाठी तात्पुरता जामीन मिळावा, अशी विनंती करणारी याचिका भीमा-कोरेगाव हिंसाचार व एल्गार परिषद प्रकरणातील एका आरोपीने उच्च न्यायालयात केली आहे. न्या. अजय गडकरी आणि न्या. राजेश पाटील यांच्या खंडपीठाने या जामीन अर्जावरील सुनावणी दोन आठवड्यांसाठी तहकूब केली.

उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज केलेल्या भीमा-कोरेगाव प्रकरणातील या आरोपीचे नाव रमेश गायचोर असे आहे.

**वडिलांची तब्येत बिघडल्याने जामीन देण्याची विनंती**

वडिलांची प्रकृती बिघडली असून, त्यांना भेटण्यासाठी जामीन देण्याची विनंती रमेश गायचोरने केली. उच्च न्यायालयाने याचिकेची दखल घेत राष्ट्रीय तपास यंत्रणेला यावर उत्तर देण्याचे आदेश देत सुनावणी दोन आठवड्यांपर्यंत तहकूब केली. गायचोर न्यायालयीन कोठडीत असून, वडिलांच्या प्रकृतीचे कारण देत त्याने तात्पुरता जामिनासाठी सत्र न्यायालयात अर्ज केला होता. मात्र विशेष न्यायालयाने जामीन देण्यास नकार दिल्याने त्याने सत्र न्यायालयाच्या आदेशाला हायकोर्टात आव्हान दिले आहे. गायचोरचे वडील ७५ वर्षांचे असून, ते आजारी असल्याने त्यांना पुण्यातील रुग्णालयात दाखल केले आहे.

## सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये महाराष्ट्र गीत बंधनकारक

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** फक्त मराठीच नव्हे तर सर्वच माध्यमांच्या शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत गाणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयाचे पालन न करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिला आहे.

दादा भुसे म्हणाले की, मराठी शाळेसोबतच आता सर्व माध्यमांच्या शाळेतही राष्ट्रगीतानंतर 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत बंधनकारक असणार आहे. यासोबतच इयत्ता चौथी, पाचवी, सातवी आणि आता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठीही शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. यामध्ये शिष्यवृत्तीधारकांची संख्याही वाढवण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयीही शालेय शिक्षण विभाग सक्रिय आहे. आता पालकांच्या उपस्थितीत आरोग्य पथकांमार्फत विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली जाणार आहे. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला एक हेल्थ कार्ड दिले जाईल. जे भविष्यात विविध ठिकाणी उपयोगी ठरेल.

## झावबावाडीच्या रहिवाशांची विकासकाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल

■ मुंबई

**गिरगावातील** जगन्नाथ चाळ झावबावाडीतील रहिवाशांना रखडलेल्या पुनर्वसनाचा लढा देण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाची पायरी चढावी लागली आहे. १४ वर्षांपासून पुनर्विकास रखडल्याने संतप्त रहिवाशांनी विकासक आणि महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

बांधकाम कायदा, १९७६ च्या कलम ९१ (अ) अंतर्गत २५ चाळी व जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाची मागणी रहिवाशांनी केली. येथील ५०० पेक्षा अधिक कुटुंब पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत. विकासकाने हा प्रकल्प हाती घेतला, परंतु आजपर्यंत या ठिकाणी कोणतेही काम झालेले नाही, असे रहिवासी व याचिकाकर्ते श्रेयस आचरेकर यांनी सांगितले आहे. तसेच, गेल्या ३ वर्षांत अनेक वेळा रहिवाशांनी याबाबत तक्रारी केल्या. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थित झालेल्या बैठकांमध्ये म्हाडाला स्पष्टपणे सूचना देत विकासकाविरोधात कारवाई करावी, असे आदेश दिले होते. रहिवाशांनी



वकिलांमार्फत म्हाडा व संबंधित अधिकाऱ्यांना १० पत्रे पाठवली असून, त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, असा आरोप स्थानिक रहिवासी रेखा दांडेकर यांनी केला आहे.

## एअर इंडियाची आंतरराष्ट्रीय उड्डाणे १ ऑक्टोबरपासून पूर्ववत

■ नवी दिल्ली

**एअर** इंडिया कंपनीच्या विमानाची काही आंतरराष्ट्रीय उड्डाणे १२ जून रोजी झालेल्या अहमदाबाद विमान अपघातानंतर अंशतः थांबवण्यात आली होती. ही उड्डाणे आता १ ऑक्टोबरपासून पूर्ववत होणार आहेत.

एअर इंडियाचे सीईओ कॅम्पबेल विल्सन यांनी आज सांगितले की, ऑगस्टपासून काही आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू झाली असून, १ ऑक्टोबरपर्यंत सर्व उड्डाणे सुरू करण्याचे लक्ष्य आहे. चौकशी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच उड्डाणे पुन्हा सुरू केली जातील. गेल्या काही आठवड्यात ऑपरेशनल समस्या आल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने (डीजीसीए) एअर इंडियाचे वार्षिक ऑडिट केले आहे. तसेच तज्ज्ञांच्या पथकाने आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटनेच्या मानकानुसार (आयएटीए) ऑपरेशनल सेफ्टी ऑडिट केले आहे.

## बाबाजानी दुर्राणी काँग्रेसमध्ये शरद पवार गटाला मोठा धक्का

■ मुंबई

**राष्ट्रवादीच्या** शरद पवार गटाचे माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी आज काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मुंबईतील टिळक भवन येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. दुर्राणी यांच्यासोबत शेकडो कार्यकर्तेही काँग्रेसमध्ये सहभागी झाले.

या पक्षप्रवेशामुळे परभणी जिल्ह्यात शरद पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. काही दिवसांपूर्वी दुर्राणी यांनी हर्षवर्धन सपकाळ यांची भेट घेतली होती. त्यानंतर त्यांच्या काँग्रेस प्रवेशाच्या चर्चा रंगल्या होत्या. अखेर आज त्यांनी समर्थक व स्थानिक पदाधिकाऱ्यांसह काँग्रेसमध्ये प्रवेश करून त्या चर्चांना पूर्णविराम दिला. काही दिवसांपूर्वीच काँग्रेसचे माजी राज्यमंत्री सुरेश वरपुडकर भाजपामध्ये सामील झाले होते. त्यामुळे दुर्राणी यांच्याकडे काँग्रेसकडून मोठी जबाबदारी देण्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यावर दुर्राणी काही काळ अजित पवार गटात गेले होते. मात्र नंतर ते शरद पवार गटात परतले होते. आता त्यांनी शरद पवारांची पुन्हा साथ सोडली आहे.

## उत्तरकाशीत ४०० पेक्षा जास्त लोकांना वाचवले

■ उत्तरकाशी

**उत्तराखंड** येथील उत्तरकाशी जिल्ह्यात दोन दिवसांपूर्वी आलेल्या जलप्रलयातून आतापर्यंत ४०० पेक्षा जास्त नागरिकांना वाचवण्यात यश आल्याची माहिती उत्तराखंड आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिली आहे. आज यातील अनेकांना हर्शील येथे आणून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार केले. या दुर्घटनेत महाराष्ट्रातील १५० पेक्षा जास्त पर्यटक अडकल्याची माहिती आहे. त्यामुळे राज्याचे आपत्तीव्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सूचनेनुसार उत्तरकाशीला रवाना झाले.

उत्तरकाशी प्रशासनाने सांगितले की,राज्य सरकार, जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन विभाग, आयटीबीपी, एनडीआरएफ आणि इतर यंत्रणा समन्वयाने काम करत आहेत. आपत्तीग्रस्त नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. ढगफुटी व मुसळधार पावसामुळे उत्तरकाशी परिसरात मोठे नुकसान झाले. त्यानंतर बचाव आणि मदतकार्य वेगाने सुरु



**मंत्री महाजन दुर्घटनास्थळी**

आहे अडकलेल्या नागरिकांना वायूमार्गे सुरक्षित स्थळी हलवले जात आहे. जखमींना तातडीने वैद्यकीय मदत दिली जात आहे.

बचावपथकाचे कॅप्टन गुरप्रीत सिंग यांनी सांगितले की,सध्या आमच्याकडे उपलब्ध असलेल्या तात्पुरत्या साधनांचाही वापर केला जात आहे. आतापर्यंत पाच मृतदेह सापडली असून सुमारे २५०-३०० लष्करी जवान या बचावकार्यात सहभागी आहेत. आम्ही एका आठवड्याच्या आत सर्व अडकलेल्या लोकांना सुरक्षित बाहेर काढण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. आतापर्यंत महाराष्ट्रातील - १२३, गुजरात - १३१, मध्य प्रदेश - २१, उत्तर प्रदेश - १२, राजस्थान - ६, दिल्ली - ७, तेलंगणा - ३, पंजाब - १, आसाम आणि कर्नाटक - प्रत्येकी ५ पर्यटकांना वाचवल्याची माहिती आहे.

## राज्यात पुढील पाच दिवसांत पावसाचा जोर पुन्हा वाढणार

**हवामान विभागाचा अंदाज**

■ मुंबई

**मागील** काही दिवस विश्रांती घेतलेला पाऊस राज्यात पुन्हा सक्रिय झाला आहे. राज्यातील अनेक भागांत पावसाने जोरदार हजेरी लावली. त्याचप्रमाणे आता पुढील चार ते पाच दिवस राज्यात मेघगर्जनेसह पाऊस कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. या कालावधीत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पावसाचा जोर अधिक असेल.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मोसमी वाऱ्यांचा कमी दाबाचा पट्टा अमृतसरपासून मुज्जफराबाद, पटियाला, अरुणाचल प्रदेश आणि हिमालयाच्या पायथ्यापर्यंत विस्तारला आहे. तसेच तामिळनाडूच्या किनाऱ्यालगत समुद्रसपाटीपासून चक्राकार वारे वाहत आहेत. तिथून पूर्व मध्य अरबी समुद्रापर्यंत हवेचा पूर्व पश्चिम कमी दाबाचा पट्टा कायम आहे. त्याचाच परिणाम म्हणून सध्या राज्यात पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे पुढील चार ते पाच दिवस राज्यात मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. या कालावधीत काही ठिकाणी जोरदार वाऱ्यासह पाऊस पडेल. काही भागात विजांसह पावसाची शक्यता आहे. दरम्यान, मोसमी वाऱ्यांचे प्रवाह मंदावल्याने गेले काही दिवस राज्यात पावसाने उघडीप दिली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा राज्यात पाऊस सक्रिय झाला आहे.



## अंगारकीला मध्यरात्रीपासून सिद्धिविनायकाचे दर्शन

■ मुंबई

**या** वर्षातील पहिली अंगारकी संकष्टी चतुर्थी मंगळवार १२ ऑगस्ट रोजी आहे. त्यानिमित्ताने दादर प्रभादेवीतील श्री सिद्धिविनायक मंदिरात भाविकांची दर्शन व्यवस्था आणि सोयी-सुविधांच्या अनुषंगाने विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. सोमवारी मध्यरात्री दीड वाजल्यापासून मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले राहणार आहे.

सोमवारी मध्यरात्री दीड ते पहाटे ३.१५ वाजेपर्यंत, पहाटे ३.५० ते रात्री ९ वाजेपर्यंत आणि रात्री ९.३९ ते रात्री ११.३० या कालावधीत भाविकांना दर्शन घेता येईल. पहाटे ३.१५ वाजता बाप्पाची आरती, दुपारी १२.१५ वाजता खीर नैवेद्य आरती, सायंकाळी ७ वाजता धुपारती, रात्री वाजता श्री चे नैवेद्य व आरती होईल, अशी माहिती श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाच्या वतीने देण्यात आली आहे. महिला आणि पुरुष, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक तसेच व्हीआयपींना दर्शनासाठी स्वतंत्र रांगा असणार आहेत. मंदिरामध्ये ड्रोन, कॅमेरा, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे घेऊन जाण्यास मनाई असेल. थेट ऑनलाईन दर्शनाचीही सोय उपलब्ध असणार आहे.

## नुकसानभरपाई नको! आम्हाला हमीभाव द्या!

■ सोलापूर

**मोहोळ** तालुक्यातील युवा शेतकरी लखन माने यांनी आपल्या शेतात साचलेल्या पाण्यात बसून राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना आर्त साद घातली आहे. आम्हाला पंचनामा

**शेतकऱ्याची आर्त हाक**

नको, नुकसानभरपाई नको, फक्त हमीभाव द्या, अशी मागणी त्यांनी केली आहे.

काल झालेल्या मुसळधार पावसामुळे सोलापूर जिल्ह्यातील शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. लखन माने यांच्या २ एकरावरील टोमॅटो पिकात पाणी साचल्यामुळे १० ते १२ रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. या परिस्थितीत हतबल झालेल्या माने यांनी शासनाकडे आपली व्यथा मांडली आहे. ते म्हणाले की, कोण रमी खेळतो,



कोण मारामारी करतो, कोणाचा बार आहे यावर चर्चा होते, पण आमच्या शेतीचे कुणालाही काही देणेघेणे नाही. सत्ताधारी आणि विरोधक आरोप-प्रत्यारोपात गुंतलेले असताना, शेतकऱ्यांचे खरे प्रश्न मात्र दुर्लक्षित होत आहेत.

## महाविकास आघाडीत समन्वयाचा अभाव! शशिकांत शिंदेंची कबुली

■ नाशिक

**विधिमंडळाच्या** पावसाळी अधिवेशनात महाविकास आघाडीमध्ये समन्वयाचा अभाव होता, अशी कबुली राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिली आहे. नाशिक शहराच्या दौऱ्यावर असताना कार्यकर्त्यांशी संवाद साधताना शिंदे बोलत होते. त्यांच्या या कबुलीमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मविआच्या एकजुटीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शशिकांत शिंदे म्हणाले की, या महायुती सरकारला मस्ती आली आहे. अधिवेशनात जर महाविकास आघाडीतील पक्ष आणि नेते एकसंध राहिले असते तर आम्ही सरकारला अधिक अडचणीत आणता आले असते. आम्हाला दोन मंत्र्यांचे राजीनामे सहज घेता आले असते. पण आमच्याच घटक पक्षांमध्ये एकी दिसली नाही. सरकारमधील मंत्र्यांच्या विधानांमुळे रोज त्यांचा कारभार जनतेसमोर येत आहे. त्यांच्या विरोधात आम्ही एकत्रित आंदोलन केले तर सरकारला अडचणीत आणता येईल. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याने शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली लवकरच एक मोर्चा काढण्यात येईल.



नारळीपौर्णिमेचा सण कोळी बांधव मोठ्या उत्साहाने साजरा करतात. यासाठी पारंपरिक पोशाखाची खरेदी करण्यासाठी दुकानांमध्ये लगबग दिसत आहे. (छाया: दीपक साळवी)

## माजी नगरसेवक गणपत गायकवाडांची सीबीआय चौकशी करण्याची मागणी

■ ठाणे

**शिवसेनेचे** माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी आपल्यावरील हल्ल्याप्रकरणी कल्याण पूर्वेतील भाजपाचे माजी आमदार गणपत काळू गायकवाड यांची केंद्रीय अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे. पोलीस तपासात त्रुटी असल्याचा आरोप महेश गायकवाड यांनी याचिकेत केला आहे. तसेच या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याची मागणीही महेश गायकवाड यांनी केली आहे.

या याचिकेवर न्या. रवींद्र व्ही. घुगे आणि न्या. गौतम ए. अंखड यांच्या खंडपीठाने उल्हासनगरमधील तपास अधिकाऱ्यांना आणि महाराष्ट्र सरकारला

**महेश गायकवाडांची याचिका**

नोटीस बजावली असून, त्यांना उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. २५ ऑगस्ट रोजी महेश गायकवाड यांच्या याचिकेवर सुनावणी होणार आहे. दरम्यान, गायकवाडांसह त्यांच्या सहकाऱ्यांनी उच्च न्यायालयात जामीन अर्ज केला होता. हा अर्ज फेटाळला.



## चुकीचे वागल्यास मकोका लावेन अजित पवारांचा बीडमध्ये इशारा

■ बीड

**बीडमधील** वाढत्या गुन्हेगारीवर भाष्य करताना 'चुकीचे वागाल तर मकोका लावू', असा इशारा आज बीडचे पालकमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला. अजित पवार बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी ऊसतोड कामगारांच्या मेळाव्याला हजेरी लावली. या मेळाव्याच्या निमित्ताने पहिल्यांदाच माजी मंत्री धनंजय मुंडे आणि भाजपा आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर एकाच व्यासपीठावर आले.

या मेळाव्याआधी अजित पवार यांनी आज पहाटे पावणेसहा वाजता त्यांनी चंपावती क्रीडा मंडळाचा आढावा घेतला. त्यानंतर कंकालेश्वर मंदिराच्या विकासाच्या आराखड्याचाही आढावा घेतला. त्यांनी बीडच्या प्रश्नांवर लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांसमवेत बैठका घेतल्या. तसेच अनेक ठिकाणी जाऊन विकासकामांची जाऊन पाहणी केली. बीड जिल्हा क्रीडा संकुल येथे कचरा पाहून ते संतापले.

मेळाव्यात अजित पवार म्हणाले की, मधल्या काळात बीड जिल्ह्याची बदनामी झाली. कायदा हातात घेणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे. चुकीचे वागत असाल, तर मकोका लावण्यात येईल. कोणालाही पाठीशी घालण्यात येणार नाही. यापुढे कोणाचीही गय केली जाणार नाही ऊसतोड कामगारांच्या हितासाठीही सरकार कटिबद्ध आहे. ऊसतोड कामगाराचा मृत्यू झाल्यास दहा लाख रुपये मदत देण्याबाबत विचार करणार आहोत. ही ऊसतोडीची शेवटची पिढी ठरावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. बीडचा रस्ते, पाणी, रोजगार या समस्या मी सोडवणार आहे.

## यवतमधील जमावबंदी अखेर हटवली! जनजीवन पूर्वपदावर

■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील यवत गावात व्हॉट्सॲपवरील आक्षेपार्ह पोस्टवरून उसळलेल्या हिंसाचारानंतर लागू करण्यात आलेली जमावबंदी आज ७ दिवसांनी पूर्णपणे हटवण्यात आली आहे. गावातील शांतता लक्षात घेता जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी हा निर्णय घेतला.

मागील आठवड्यात एका व्हॉट्सॲप पोस्टमुळे दोन गटांत वाद झाला होता. त्यामुळे गावात तणावपूर्ण आणि दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. परिणामी १ ऑगस्टपासून जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले होते. काल या संचारबंदीत सकाळी ६ ते रात्री ११ या वेळेत काही अंशी शिथिलता देण्यात आली होती. आज जिल्हा प्रशासनाने पूर्णतः जमावबंदी उठवल्याने यवतमधील जनजीवन पूर्वपदावर आले आहे. व्यापाऱ्यांनी आपली दुकाने पुन्हा सुरू केली.

## कुर्ला मदर डेअरी वाचवा पदयात्रा पोलिसांनी थांबवली

■ मुंबई

**धारावी** पुनर्विकास प्रकल्पांतर्गत अपात्र रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी कुर्ला मदर डेअरीची २१ हेक्टर जागा वापरण्याच्या निर्णयाला स्थानिकांनी तीव्र विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर कुर्लावासीयांनी आज मदर डेअरीपासून मुख्यमंत्री निवासस्थान वर्षा बंगल्यापर्यंत पदयात्रा काढण्याचा निर्णय घेतला होता. मात्र ही पदयात्रा सुरू होण्यापूर्वीच नेहरू नगर पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतले.

राज्य सरकारने धारावीतील अपात्र रहिवाशांना घरकूल देण्यासाठी धारावी पुनर्विकास प्रकल्पाला (डीआरपी) शहरातील विविध ठिकाणी जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यामध्ये कुर्ला परिसरातील हिरवळीने भरलेल्या मदर डेअरीच्या जागेचादेखील समावेश आहे. मात्र, ही जागा सार्वजनिक उद्यानासाठी राखीव ठेवावी, अशी मागणी कुर्लावासीयांनी केली आहे.

या मागणीला सरकारकडून प्रतिसाद मिळत नसल्यामुळे आज नागरिकांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी वर्षा निवासावर धडक देण्याचे ठरवले. पण नेहरू नगर पोलिसांनी पदयात्रा सुरू होण्याआधीच आंदोलनात सहभागी कार्यकर्ते किरण पहिलवान, स्नेहल पहिलवान, श्रीकांत पत्की, विद्या इंगवले यांना ताब्यात घेऊन आझाद मैदानात नेले.